१७ नोव्हेंबर १९७३

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : पंचवीसावा

५ नोव्हेंबर, ७३

**सप्रेम नमस्कार...**

□ 'माणूस'चा दिवाळी अंक नुकताच वाचून संपवला. पुष्पा भावे आणि भाऊ पाध्ये सोडल्यास बाकी सर्व बेस्ट. रवींद्र पिंगे यांचा लेख म्हणजे मराठी साहित्यातील एक अनमोल contribution ठरेल इतका उत्कृष्ट. गाडीतल्या डुलक्या घेणाऱ्या प्रवाशांबरोबर मी सुद्धा प्रवासात होतो. भारताच्या सद्यःस्थितीवरील कॉमेंट वाचून खूप बरे वाटले. दि. बा. मोकाशींची कथा, त्यातील सखू मला भेटली आणि माझ्या डोळ्यातून दोन अश्रू ठिबकले. अमेरिकन शाळा ही गोष्ट लेखकाची स्वतःचीच असून प्रथमच प्रसिद्ध झाली आहे.

सर्वात प्रकर्षाने जाणवले ते आपले चोखंदळ संपादकत्व. Hats off. माझ्या मते माणूस सारखा दुसरा दिवाळी अंक निघालाच नाही. किंमत मात्र जास्त वाटली. किंमत कमी करता आल्यास बरे.

**सुभाष नाईक, पेण** (कुलाबा)

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# ज्या देशात

अशोक प्रभाकर डांगे

ज्या देशात
माणसं माणसांची
कातडी सोलून खातात !
श्रीमंत कटोरे घेऊन
भिकेची, प्रदर्शनं भरवतात,
आणि भिकारी
आंतड्यातले खड्डे भरून
दानाची बाशिंगं बांधतात !
—
ज्या देशात
माणसं पोटात
चरबीची झाडं लावतात,
आणि उद्याला पारखे झालेले,
उष्टया पत्रावळीवरचे
प्रोटीन्स चाटतात !
—
ज्या देशात
माणसं खुर्च्यांचे
देव करतात.
आणि दुसऱ्यांच्या सुखाचे
कबाब खाऊन
आपली केसाळ पोटं वाढवतात !
—
ज्या देशात
टोप्या सरड्यासारखे
रंग बदलतात,
आणि बगळ्यासारखे,
माना पाडून
स्वार्थाचे मासे गिळतात !
—
ज्या देशात
अधिकाराचे मळवट भरल्यावर
कुणीही विकले जातात.
आणि सचोटीचा अबिरबुक्का

लावणारे
तिरडीवरून त्यांना हसतात !
—
ज्या देशात
आलीशान संडासात
काळे पैसे वस्ती करतात,
आणि करदाते नोकरदार
टाचा झिजवून मरतात !
—
ज्या देशात
माणसं स्त्रियांना
नग्न करून
गाढवावरून मिरवत नेतात.
आणि भरघोस कपड्यांनी
देह झाकून
सभ्यतेची धूळवड खेळतात !
—
ज्या देशात
तरुणांचे कुरळे केस
लवकर पिकतात.
आणि नवी नवखी हेअरऑइल
धूमधडाक्यानं खपतात !
—
ज्या देशात
हताश तरुणी
ऋतु संपवून
कुंवार हिंडतात.
आणि गलितगात्र म्हातारे
विकत घेऊन
बायका करतात !
—
ज्या देशातल्या दिवाणखान्यात
भिंतींना कॅक्टस फुटतात.
आणि कोळशाच्या पुण्यासाठी
हिरवी रानं सती जातात !
—
ज्या देशात
स्त्रियांचे देव करून
पूजा करतात,
आणि वेळप्रसंगी
त्यांच्या स्तनावर
जळत्याचे शिक्के मारतात
—
ज्या देशात
माणसं सिमीटात
माती सारतात.
आणि बांधकामं कोसळल्यावर
विधवांना पैसे वाटतात !
—
ज्या देशातल्या बायका
पोरांसाठी नवस बांधतात.
आणि बारा पोरांना रांधून
वाढती पोटं
मिरवत फिरतात !
—
ज्या देशात
विचारवंत,
अलिप्ततेच्या गोशात रहातात.
आणि त्यांना विकत घेणारे
इसापाच्या गोष्टी सांगतात !
—
ज्या देशातल्या
ॲम्बॅसेडर्सना,
डायबेटीसच्या बाधा होतात.
आणि आलीशान बंगल्यांना
हृदयविकाराचे झटके येतात !
किंवा काही माणसं
फ्रेंच पॉलीशनं

आतडी रंगवून
गुत्त्यांवरून स्वर्गात जातात !
—
ज्या देशात
पोटासाठी
पोटाखाली, आगी लागतात.
आणि कुलीन रांडा
कुलीन स्तन दिवाणखान्यात
मांडून बसतात !
—
ज्या देशातली पोरं
कॉप्या करून डिग्र्या घेतात.
आणि घाउक पैशासाठी मग
शेपट्या हलवत हलवत जगतात !
—
ज्या देशात वृत्तपत्रांना
जाहिरातींची कोडं फुटतात
आणि आलिशान संपादक
विचाराचे डोहाळे गातात !
—
ज्या देशातले लोक
अनवाणी तळवे जाळतात.
आणि जोड्याचे मॅचिंग ढंग
शोकेसेस रोज विकतात !
—
ज्या देशात उन्हाची
मेंदी लावून
सण सजतात.
आणि मेंदूतल्या रक्तस्रावांनं
माणसं
एअरकंडिशण्ड सुखात,
चिणून मरतात !
—
ज्या देशात
लोक आपली
हत्तीवरून प्रेतं नेतात.
आणि वाजत गाजत
सुखाच्या
पिंडाला, कावळे शिवतात !
—
ज्या देशातली माणसं
सुंदर जागी
सुंदर थुंकतात
आणि घरदार
स्वच्छ राखून
नोकरांवर उगीचच भुंकतात !
—
ज्या देशातले लोक
खोट्या जाहिरातींना हसतात.
आणि शहाणपणाची
शिंगं बांधून
स्वतःलाच फसवून घेतात.
—
ज्या देशातले लोक
जळत्या लाकडाखाली
जगतात
आणि इमारतीच्या उरावर
निऑन्सची झाडं लावतात.
—
ज्या देशात....
....................
................
त्या देशाचा
विजय असो !
विजय असो !

• • •

# मुक्काम शहादे

# पी. के. पाटलांची हत्यारी फौज

अंबरसिंग, गोविंदराव शिंदे, पुण्या-मुंबईहून गेलेले काही ध्येयवादी तरुण इत्यादींच्या प्रयत्नामुळे शहादे-तळोदे तालुक्यातील आदिवासींच्या चळवळीला चांगलाच उठाव आलेला आहे. हजारो एकर जमिनी आदिवासींना परत मिळाल्या. आपापसात सहकार्य करून यापैकी बहुतेक जमिनी आदिवासींनी यंदा लागवडीखाली आणल्या. शेतमजूर संघटित होऊन त्यांनी आपल्या मजूरीत वाढ करून घेतली, कामाच्या काही अटीतही सवलती मिळवल्या. महाराष्ट्रातील असंख्य वृत्तपत्रे, विविध राजकीय व सामाजिक संघटनांकडून या चळवळीला चांगलाच पाठिंबा मिळालेला आहे. यामुळे या भागातील प्रतिष्ठित जमीनदार, सावकारवर्ग नेस्तनाबूत नाही पण या पहिल्या फेरीत तरी नामोहरम झालेला आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांवर हल्ले करणे, खोट्या पोलीस केसेस करून त्यांना जेरीस आणणे इत्यादी दडपशाहीचे मार्ग वापरून ही चळवळ बंद पाडण्याचा, पुण्या-मुंबईहून आलेल्या ध्येयवादी कार्यकर्त्यांना बाहेर हाकलण्याचा या मंडळींचा आता प्रयत्न सुरू आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजेच श्री. पी. के. पाटील या जमीनदारांच्या या भागातील पुढाऱ्याने पुढे मांडलेली हत्यारी पीक संरक्षकांची एक नवीन योजना. या योजनेचे थोडक्यात स्वरूप पुढीलप्रमाणे आहे—(तक्ता पृष्ठ ६ वर पहा)

या योजनेमागील भूमिका समजावून देण्यासाठी, जनमत अजमावण्यासाठी व आदिवासी व शेतमजुरांच्या चळवळीच्या प्रवक्त्यांनी घेतलेल्या आक्षेपांना उत्तर देण्यासाठी एक सभा ३० ऑक्टोबरला शहादे येथील मनरंजन चित्रपटगृहात जमीनदार वर्गातर्फे घेण्यात आली. या सभेत भाषण करताना येथील साखर कारखान्याचे अध्यक्ष व या हत्यारी संरक्षक दलाचे प्रवर्तक श्री. पी. के. पाटील म्हणाले—

आजच्या समाजात सर्वांना सुरक्षितेची गरज आहे. प्राण, मालमत्ता-सौंदर्य या सर्वांचा विमा उतरवला जातो. ही देखील एक प्रकारची सुरक्षितताच आहे. पुण्या-मुंबईकडे हाऊसिंग

## प्राथमिक खर्च

| | |
|---|---|
| १ जीप | ३०,००० |
| १२ मोटार सायकल्स (७००० प्रमाणे) | ८४,००० |
| १०० घोडे (रु. २००० प्रमाणे) | २,००,००० |
| १२० बंदुका (रु. ९०० प्रमाणे) | १,०८,००० |
| | ४,२२,००० |

## अंदाजे खर्च प्रत्येक महिन्यास

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२०० | रखवालदारांना | प्रत्येकी | ९० रु. | प्रमाणे | | १,०८,००० |
| १०० | हवालदारांना | ,, | १५० रु. | ,, | | १५,००० |
| १२ | कमांडर | ,, | २५० रु. | ,, | | ३,००० |
| १ | मेजर | ,, | ४०० रु. | , | | ४०० |
| ६ | क्लार्क्स | ,, | १५० रु. | ,, | | ९०० |
| १०० | घोड्यांना | ,, | ६०० रु. | ,, | चंदी | ६,००० |
| १२ | मोटार सायकली | ,, | २०० रु. | ., | पेट्रोल | २,४०० |
| १ | जीप | ,, | १००० रु. | ., | ,, | १,००० |
| | | | | | | १,४६,७०० |
| | | | | | अॅम्युनिशन खर्च दर महिन्यास | १,५०० |
| | | | | | | १,४८,२०० |
| | | | | | वार्षिक खर्च अंदाजे | १७,७८,४०० |
| | | | | | वार्षिक घसारा | १,०५,००० |
| | | | | | | १८,८३,४०० |

## वार्षिक उत्पन्नाचा अंदाज

आपल्याकडे एकूण ४,७४,००० एकर जमीन लागवडीखाली आहे. त्यापैकी सुमारे २,४,००० एकर जमिनीत अन्य कारणाने पीक घेतले जाणार नाही. अंदाजे तितक्याच जमिनीत दुबार पीक घेतले जाईल. म्हणून हिशोबात धरताना ४,७५,००० एकर जमीन धरली आहे. त्यात अंदाजे ३०,००० एकर ऊस ४५,००० एकर इतर बागायत व ४,००,००० एकर कोरडवाहू पीक येईल.

| | | |
|---|---|---|
| ३०,००० | एकर ऊस वार्षिक दर एकरी ७ रु. प्रमाणे | २,१०,००० |
| ४५,००० | ,, इतर बागायत वार्षिक दर एकरी ५ रु. प्रमाणे | २,२५,००० |
| ४,००,००० | ,, कोरडवाहू वार्षिक दर एकरी ४ रु. प्रमाणे | १६,००,००० |
| | | २०,३५,००० |

असे केल्यास देखील कारखान्याला सुरवातीचा खर्च (जीप, मोटार सायकल, घोडे, बंदुका) वसूल होण्यास १ ते ३ वर्षे लागतील.

सोसायटींना सुद्धा जंवियाधारी वॉचमनची गरज असते. एस. आर. पी., पोलीस हे सर्व असून देखील हे वॉचमन संरक्षणासाठी असतातच. बँका, दुकानदार, थिएटर्स ह्यांच्या बाबतीतसुद्धा आपल्याला कडक संरक्षणाची खाजगी व्यवस्था पहावयास मिळते. सर्व पोलीस, एस. आर. पी. हे सरकारीच असतात, तरी सुद्धा सरकारी तिजोरीवरचा पहारेकरी वेगळाच असतो. शेती या क्षेत्रामध्ये अफाट साधनसामुग्री, संपत्ती ही उघडयावर पसरलेली असते. ऊस, कापूस. केळी, धान्य या सर्वांच्या संरक्षणाची गरज आहे. आज अनेक समाजविघातक प्रवृती आपल्याला समाजात पहावयाला मिळतात. खरे पहाता उपलब्ध श्रमशक्ती वापरून उत्पादन वाढवले पाहिजे. परंतु श्रमाने निर्माण केलेली संपत्ती समाजविघातक लोक नष्ट करतात, चोरून नेतात. लहान मुलाला आई जसे वळण लावते तसे आज समाजाला वळण लावण्याची गरज आहे. प्रथम कष्ट करून उत्पादन वाढवले पाहिजे आणि त्याची जपणूक केली पाहिजे. काम करून उत्पादन करावे लागते आणि काम हे मिळवावे लागते. शेतकऱ्यांना बऱ्याच प्रकारचे हाल सोसावे लागतात. या दुष्काळात शेतकऱ्यांना मजुरी करण्यासाठी दुष्काळी कामावर जावे लागते. सर्व जमीन मालक हे पाच, दहा, वीस फार तर वीस एकर जमिनीचे मालक आहेत. या छोटया शेतकऱ्यांच्या हाती त्यांचे उत्पादन पडलेच पाहिजे. शतकऱ्याला निरनिराळे धोके असतात. पाऊस, चोरी, बाजारातील किमत. त्यातील चोरीबाबत सुरक्षितता मिळविण्यासाठी ही योजना आहे. पिकाच्या Insurance बाबत आज चर्चा केली जाते पण ती अजून प्रत्यक्षात आली नाही. आम्ही तक्रारी घेऊन गेलो असता डी. एस. पी. फौजदार म्हणतात की तुम्ही तुमच्या पिकांचे संरक्षण केले पाहिजे. आज कॉंग्रेस सरकारमध्ये CPI, सर्वोदय अशा सर्व विचारसरणीचे लोक आहेत. त्या गोष्टीवर संपूर्ण जीवन अवलंबून असते अशा डोष्टीबद्दल त्यांनी कोणती सरकारी योजना काढली आहे? Indian Penal Code हे फार जुने आहे आणि नवीन कायद्याचा कायद्यापेक्षा त्रासच जास्त होतो. उदा. जमीन सुधारणा कायदे, शहरी मालमत्तेवरील मर्यादा, सर्व वर्तमानपत्रातून जमिनदार हा शब्द वापरला आहे, या भागात कोणाचीही जमिनदार म्हणण्याइतपत जमीन नाही. सोळाशे चौरस मैलातील एका घटनेकडे वोट दाखवून बोंबाबोंब केली जाते. पाटीलवाडी, पाटीलवाडी, विश्रामहरी पाटील (गुजर.) जशा तऱ्हेने अन्यायाचा गाजावाजा होतो. या अन्याया बाबतच्या वर्णनावरून असा प्रश्न पडतो, की आपण किती अन्याय केला? किती माणसे मारली? आम्ही काही एवढा अन्याय केलेला नाही. या सर्व वर्तमानपत्रकारांच्या मनात दुष्टावा आहे. मतस्वातंत्र्याचा हा दुरुपयोग आहे. १००% आदिवासी भागातील गावे असे म्हणतात की उद्या कशाला

आजच ही योजना अंमलात आणा. (टाळ्या). वाढत्या महागाईमुळे Budget ही जास्तच असणार. आमच्या साठी स्वतःचा जीव धोक्यात घालणाऱ्यांना आम्हाला चांगल्या तऱ्हेने 'मेंटेन' करावे लागेल. या योजनेला विरोध म्हणजे समाजविघातक गोष्टींना साथ आहे. उना. पाडळदे गावामधून बऱ्याच तक्रारी हल्ली ऐकू येतात. चोऱ्या व खुनाच्या धमक्या यामुळे काम देणारा, करणारा कोणीच रहाणार नाही.

आजकाल राजकीय कार्यकर्ते सुद्धा वर्गणी गोळा करून जीप घेण्याच्या मागे लागले आहेत. तर सुरक्षा राखणाऱ्याना सुद्धा जीप, मोटरसायकल्स लागणारच पावसाळ्यात जीप, मोटरसायकल्स या कुचकामी ठरत असल्याने घोड्यांची जरूरी आहे. फौजदार हवालदार हे कायद्याच्या संरक्षणासाठी बंदुका घेऊन हिंडतात. याचा अर्थ ते नरमेध करण्यासाठी बाहेर पडतात असा नव्हे. १५०० रु. दारुगोळ्यावरती खर्च करणे म्हणजे तो सर्व वापरणे किंवा तेवढी माणसे मारणे असा नव्हे. लायन्सेस, जुना दारुगोळा बदलून नवीन घेणे या सर्व गोष्टीसाठी या खर्चाची गरज आहे आणि Budget जरी वीस लाखांचे असले तरी एकरी खर्च वर्षाला ४–५ रु, च्या दरम्यान आहे. ही योजना राबविण्यात बदनामीकारक असे काहीच नाही. 'जो स्वतःला मदत करतो त्यालाच देव मदत करतो' अशी सरकारी भूमिका आहे. योजना आदर्श रीतीने राबविण्यात आली पाहिजे आपण शेतमजूरांना कमी न समजता त्यांनाही न्याय दिला पाहिजे. ◻

प्रश्न असा पडतो की, या योजनेची आवश्यकता आजच का भासावी?

एक कारण ह्या दोन तालुक्यात पिकाच्या चोरीचे प्रमाण फारच वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्याना त्यांच्या पिकाबद्दल खूप काळजी वाटत असेल अगर ह्या भागात खून व दरोड्यांचे प्रमाण खूप वाढले असेल. परंतु पोलिसांकडे ह्यासंबंधीची माहिती आहेच. त्यावरून इतर तालुक्यांपेक्षा येथे काय असे मोठे गुन्हे घडतात ते तरी समजू द्या? असे किती लुटालुटीचे प्रकार झाले ते तरी समजू द्या? दुष्काळी वर्षात इतर तालुक्यात अनेक सामूहिक


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

लुटालुटीचे प्रकार होऊनही तेथे कोठे अशी योजना राबविण्यात येणार असल्याचे ऐकिवात नाही. मग येथेच एकदम अशी गरज का भासावी? आणि जरी असे प्रकार वाढले तरी चोरांपासून संरक्षण देण्यासाठीच पोलीस खाते असते ना? का येथे पोलीस यंत्रणाच अस्तित्वात नाही? येथले पोलीस खाते आणि डी. एस. पी. एवढे आंधळे आहेत काय? तसे जर नसेल तर मग ही प्रतिलष्कर उभारण्याची योजना काय म्हणून राबविली जाणार आहे! सध्या हत्यारी पोलीस हिंडतात ते आपण समजू शकतो. परंतु स्वतंत्र योजनेचे प्रयोजन काय? एकूण हा सारा प्रकारच लोकशाहीला व सरकारला आव्हान देणारा आहे असे वाटते.

ह्या पूर्वीही येथे काही पीक संरक्षण योजना होत्या. त्यांचा अनुभव असा आहे की, त्यांचे वॉचमन कोणाही इसमाला संशय आला तरीही पकडून ऑफिसमध्ये नेत व वाटेल तशी मारहाण करून ५० रु. १५० रु. मनमानेल तसा दंडही करीत. वास्तविक दंड करण्याचा अधिकार फक्त सरकारलाच असतो. आता लोकांच्या संघटित, प्रयत्नामुळे हे प्रकार बरेच कमीच झाले आहेत. ह्या योजना एका भागात थोड्या गावापुरत्याच मर्यादित असूनसुद्धा त्यांच्यामार्फत एवढा अन्याय होत असे. मग नवीन एककेंद्री व तालुकाव्यापी कारभार कसा होईल ह्याची कल्पनाच केलेली बरी. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी, की ही योजना राबविण्यासाठी जमा करण्यात येणाऱ्या पैशांपैकी सर्वात जास्त म्हणजे १६,००,००० (सोळा लाख) रु. हे कोरडवाहू जमीन मालकांकडून घेण्यात येणार आहेत. म्हणजे गरीब शेतकऱ्याच्याच खिशाला सर्वात जास्त फटका बसणार आहे आणि आज तर स्वतःच्या पिकाचे संरक्षण तो स्वतःच करीत असतो. त्याला या योजनेची काहीच गरज नाही. म्हणजे, श्रीमंत शेतकऱ्यांच्या हिताची ही योजना गरीब शेतकऱ्यांच्या हिताआड येणारी आहे.

आणि एकदा ही योजना अंमलात आली, की मग ह्याच गरीब शेतकऱ्यांना भूमिहीन मजुरांना आज त्यांच्या गुरासाठी जो चारा मिळतो तोही मिळणे मुश्किल होईल. त्याचप्रमाणे स्वतःच्या शेतात नांगरणी-कापणीसारखी कामे करण्यासाठीसुद्धा ह्या सोसायटीची परवानगी घ्यावी लागेल. ह्या सर्वातून निर्माण होणाऱ्या नोकरशाहाचे बळी शेवटी हे गरीब लोकच ठरणार आहेत. एवढेच काय पण शेतातून जाणाऱ्या पाऊलवाटेवरही बंधन पडून खेड्यातील जीवनच विस्कळित होणार आहे.

आणि या सगळ्याहूनही भयंकर म्हणजे हे सर्व वॉचमन शस्त्रधारी असणार आहेत. आता खेडेगावातून सरकारी लोकांशिवाय बंदुकधारी लोक हिंडणार ह्याचा परिणाम काय होईल ते सहज समजणे शक्य आहे.

— माहितगार

मुक्काम पुणे

# संभाजी पूल : अलिकडे, पलीकडे

समारंभपूर्वक पुस्तक प्रकाशन करण्याची परंपरा बऱ्यापैकी रुजली असली तरी मैदानी थाटाचा प्रकाशन समारंभ हा काहीसा अपूर्व वाटणारा योग रवीन्द्र भट यांच्या 'सागरा प्राण तळमळला' या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावरील कादंबरीच्या प्रकाशन समारंभाच्या निमित्ताने जुळून आला.

कार्यक्रम आणि कार्यस्थळ यांचे काही नाते असते. भाऊ बापू नारायणगावकराचा तमाशा आर्यभूषणलाच झाला पाहिजे. मारून मुटकून त्याला भरत नाट्य मंदिर अथवा बालगंधर्वामध्ये आणून बसवले तर फक्त प्रयोग होतो. शान तमाशाची न राहता तमाशाचे 'लोकनाट्य' होते. कार्यक्रमाचा पोत बदलतो. कार्यक्रम पुस्तक प्रकाशन समारंभ आणि कार्यस्थळ भले मोठे पटांगण हे नातेही असेच काहीसे न जमणारे. टेबलावर पडून सस्नेह आमंत्रण देणाऱ्या निमंत्रण पत्रिकेवर नजर टाकल्यावर या अजोड नात्याची ही पाल सहज चुकचुकून गेली.

भव्य व्यासपीठ. उत्कृष्ट प्रकाशयोजना, मागील बाजूला स्वातंत्र्यवीरांचे चिरपरिचित छायाचित्र. त्यावर सुंदरसा हार. मैदानाची पद्धतशीर आखणी. निमंत्रितांसाठी खुर्च्या, महिलांसाठी वेगळा ब्लॉक, दूरवर पसरलेले ध्वनीक्षेपक. मार्गदर्शन करणारे स्वयंसेवक. राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्याच्या जाहीर सभेला असावा असा सगळा थाट आणि माईकवर पहिला आवाज उमटला.. खासदार अटलबिहारी बाजपेयी लवकरच सभास्थानी दाखल होत आहेत. उभे राहिलेल्या मंडळींनी बसून घ्यावें—वगैरे नेहमीच्या सूचना. पुन्हा एकदा माझी नजर हातातल्या निमंत्रण पत्रिकेवर गेली. कार्यक्रम पुस्तक प्रकाशन समारंभाचाच होता.

मानकरी मंडळी स्थानापन्न झाली. निमंत्रितांचा ब्लॉक गच्च भरला होता. संयोजकांच्या आपेक्षेपेक्षाही जनता मोठ्या प्रमाणावर उपस्थित होती. ज्ञानपीठाचे कलाकार स्वातंत्र्यवीरांच्या स्वतंत्रता स्तोत्राचे गायन करण्यासाठी सज्ज झाले. कार्य घरचेच असल्यावर मानसिक अवस्था मोठी विचित्र असते. मनावर दडपणही असते आणि सर्व गोष्टी बऱ्याच सुसूत्र चालू असतील तर समाधानही. अशाच काहीशा अस्वस्थ

अवस्थेमध्ये वावरणाऱ्या रवीन्द्र भटांनी संगीतकाराच्या सफाईने गायनासाठी सज्ज असलेल्या कलाकारांना खुणेचा इशारा दिला आणि जयोस्तुतेचे स्वर निनादले. संगीत दिग्दर्शक—जमलेली तमाम जनता केवळ आपल्या कार्यक्रमासाठी जमा झाली आहेत अशा समजुतीने आणि उत्साहाने गायकांना मार्गदर्शन करीत होता.

कार्यक्रमाचे स्वरूप व्यापक ठेवले, अनेक नामवंतांना पाचारण केले की भले तुम्ही कितीही योजनाबद्ध कार्यक्रम आखा, कोणीतरी दणका देतोच. अटलजींच्या सोयीसाठी कार्यक्रम एक दिवस अलीकडे आणला आणि ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके ही जोडगोळी निसटली. आयत्यावेळी गोपीनाथ तळवलकरांना अध्यक्षीय खुर्चीवर स्थानापन्न करण्यात आले. सर्व कार्यक्रमाचा केंद्रबिंदू अर्थातच अटलविहारी वाजपेयी. व्यासपीठावर स्थानापन्न झालेल्या प्रत्येकाला याची जाणीव होती. एक वन्दे मातरम्‌चा अपवाद वगळून प्रकाशनसुद्धा सर्व कार्यक्रम शक्य तेवढ्या झपाट्यात उरकण्यात आले. संगीत आघाडी अजून मजबूत होती. प्रेक्षक अस्वस्थ होईपर्यंत त्यांनी सागरा प्राण तळमळला – ही स्वातंत्र्य वीरांची रचना वेगळ्याच चालीतून आळवली.

अटलजी उठले. सभा सावरून बसली. दोन मिनिटे श्रोतृवृंदावर नजर टाकून धीम्या आवाजात त्यांनी बोलायला प्रारंभ केला. विषय अर्थातच स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर. मर्यादित वेळेमध्ये सुंदर मांडणी, मार्मिक उपमा, मर्मस्थळे निवडून उपहासगर्भ टीका करण्याची हातोटी, श्रोत्याला अस्वस्थ करणारा जोष आणि भाषणाची नाट्यपूर्ण खुलावट ही अटलजींच्या भाषणाची वैशिष्ट्ये कमीअधिक फरकाने या भाषणामध्येही जाणवली. प्रस्तावनेतील आवश्यक भागाचा संदर्भ त्यांनी छान सांधून घेतला. आधीच्या वक्त्यांच्या भाषणातील महत्त्वाच्या मुद्द्यांवरही त्यांनी भाष्य केले. मराठी बोलण्याइतकी या भाषेशी जानपहचान झाली नसली तरी मराठी समजण्याइतकी दोस्ती झाल्याचे जरूर जाणवले. समारंभाचे औचित्य आणि विषयाचा संदर्भ किंचितही न सोडता त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, सामाजिक समतेचे थोर उद्‌गाते, या नात्याने बजावलेल्या कामगिरीचे मूल्यमापन मार्मिक वाटले. शासकीय इतिहासाच्या संदर्भामध्ये त्यांनी केलेली टीका वाजवी असली तरी राजकीय पुढाऱ्याची झलक दाखवणारी होती. अंदमान द्वीप समूहाला 'सावरकर द्वीप' हे नाव द्यावे या अटलजींच्या सूचनेचे टाळ्यांच्या गजरामध्ये स्वागत न होते तरच नवल. लेखकाच्या लेखनप्रवृत्तीसंबंधी त्यांनी व्यक्त केलेले विचार ग. दि. यांच्या यवतमाळच्या अध्यक्षीय भाषणाशी मिळते जुळते वाटले.

काव्य– नाट्य– लोकनाट्य– चित्रपट आणि कादंबरी अशी वाटचाल करणाऱ्या रवींद्रबाबूंनी अपयश तर खूप पचवले

आहे. ' इंद्रायणी काठी 'च्या निमित्ताने घवघवीत यश त्यांच्या वाट्याला आले. केवळ यशाचा विचार केला तर सावरकरही बऱ्यापैकी मानवतील असे दिसते. (समारंभस्थळी सवलतीच्या दरात–वऱ्याच प्रती जागच्या जागी हालल्या, त्यावरून हा अंदाज) भटांचा पुढील विषय भगीरथ आहे. कादंबरीचा प्रांतच बाबुजींना मानवेल असे दिसते. अर्थात कलंदर वृत्तीचे भट इतर प्रांतातही टोलेबाजी करीत राहातीलच.

□

समारंभ पुस्तक प्रकाशनाचा, हजेरी विरोधी पक्षीय अटलजींची आणि तरीही खाकी कपड्यातील मंडळींची लक्षात येण्याइतकी उपस्थिती. कारण...

कारण एकच. पुलापलीकडील वादग्रस्त दर्गा. न जाणो–समारंभानंतर काही तरुण मंडळी दर्ग्याकडे धावली तर ! बंदोबस्तामध्ये कसूर नको ही पोलीसखात्याची दृष्टी. आज शहराच्या पूर्व भागात कुठेही फेरफटका मारा. प्रत्येक मशिदीसमोर, दर्ग्यासमोर भला मोठा बाकडा, चार-दोन खुर्च्या आणि खाकी कपड्यातील कडक पहारा. कारण...कारण तेच. दीर्घकाळ धुमसणारा तो पुलापलीकडचा दर्गा.

अलका चित्रपटगृहाच्या बाजूने तुम्ही संभाजी पूल ओलांडून पलीकडे गेलात की चक्क पोलीस कॅम्पमध्येच दाखल होता. गेली दोन वर्षे ठाण मांडून बसलेला एक भला मोठा तंबू. कायम वास्तव्याला असलेली पोलीस मंडळी. बाहेरच्या बाजूला पूर्ण लांबीच्या खाकी पॅन्टस घातलेली अधिकारी मंडळी. पलीकडे केळयांच्या गाड्या असतात. तिथे एक भली मोठी पोलीस गाडी. बहुधा वायरलेसचाही बंदोबस्त असावा.

हे दर्गा प्रकरण नेमके आहे तरी काय ! स्पष्टच लिहायचे तर आता प्रकरण म्हणण्यासारखे यात काहीही उरलेले नाही. चार वर्षापेक्षा जास्त काळ चावून चोथा झालेला हा दर्गा विषय शासनाने आणि काही स्थानिक पुढाऱ्यांनी राजकीय उद्दिष्टांनी धुमसत ठेवला आहे. या धुमसणाऱ्या दर्ग्याचे प्रतिसाद अधून मधून उमटत असतात. नुकत्याच झालेल्या एका जाहीर सभेमध्ये हे पडसाद जास्त तीव्रपणे उमटले एवढेच.


# एका पराभवाची कहाणी

ले : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

वक्ते सगळे एका विचाराचे. अगदी चिरडीला आलेले. श्रोत्यांमध्ये चांगली ४।५ हजार मंडळी. सगळ्यांचे मागणे एकच–दर्गा हलवून रस्तारुंदीतील अडचण दूर करा. अन्यथा आम्ही हे काम करू. शिवसेनेची मंडळी पत्रके काढीत आहेत. स्थायी समितीच्या अध्यक्षपदी असलेले काँग्रेस पक्षीय श्रीकांत शिरोळेही पर्यायी जागा देण्याच्या विरुद्ध आहेत.

त्वरित निर्णय करण्याचे अधिकार शासकीय कर्मचाऱ्यांना असते तर दर्गा केव्हाच वाजूला झाला असता. देवळे काय कमी वाजूला झाली? चौकातला गणपती, विठोबा रातोरात उचलला जातो. आणि कोर्टकचेऱ्या, कमिशन, हे सर्व प्रकार होऊनही बेसनदशीर ठरलेला दर्गा, रस्ता रुंदीसाठी त्या जागेची अत्यंत गरज असतानाही पोलीस बंदोबस्तामध्ये सुरक्षित राहतो. हा प्रकार चीड आणणारा आहे. प्रागतिक विचारांचे म्हणून प्रसिद्ध असलेले मुस्लिम नेतेही या दर्गा प्रकरणी मूग गिळून बसतात. वास्तविक हा दर्गा जर वेळीच हलवला गेला असता तर आता ठुसठुसणारे हे गळू इतके तापदायक ठरलेच नसते. पण फाजील दक्षता घेण्याच्या नादामध्ये आधीच घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सतत लांबणीवर पडली व वातावरण स्फोटक बनले. आणि असे सांगतात, की पोलीस कमिशनर कदमवांडे यांनी तातडीने दर्गा हलवावा अथवा आपली बदली करावी अशी मागणी केली आहे. पण शासन, महापालिका अजून ठुम्म बसून आहे. समाजकंटक ठिणगी पडण्याची वाट बघत आहेत. हिंदू तरुणांची दर्गा उखडून टाकू अशा धमक्या देणारी पत्रके निघत आहेत. काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या फुले मंडईतील मंडळीही, दर्गा तातडीने हलवा, अन्यथा परिणामास तयार रहा असा इशारा देणारे बोर्ड लाऊन बसली आहेत. आणि या वर शासनाची प्रतिक्रिया – वाढता पोलीस बंदोबस्त! या बंदोबस्तामुळे मंडळी आणखी चिडली आहेत. पर्यायी जागेच्या कल्पनेला वाढता विरोध होत आहे. (जागा देवून चटकन दर्गा हलवला असता तर पर्यायी जागा देणेही शक्य झाले असते. पण 'प्रकरण विचाराधीन' ठेवण्याच्या वृत्तीमुळे आता पर्यायी जागेचा हा पर्यायही खुला राहिलेला नाही.) उलट रस्ता रुंदीसाठी हलवलेली मंदिरे पुन्हा पूर्वस्थळी आणण्याचा विचारही काहींच्या डोक्यात घोळत आहे.

रोजच्या या उलटसुलट वार्तांनी सर्वसाधारण शांतताप्रीय नागरिक त्रस्त होऊन गेला आहे. आगामी महापालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करून चालवलेला हा निर्लज्ज मुस्लिम अनुनय थांबवला नाही तर पुण्यामध्ये विनाकारण पुन्हा एक कडवट वावटळ उठण्याची शक्यता आहे. अशी वावटळ उठल्यावरच सुस्त झालेल्या शासनाला जाग येणार आहे का?

—शरद कृष्णन

# बुवा सामंत

## विधायक कार्यकर्त्याचा खून

'जोहारी मास्तर' बुवांची हाक ऐकू आली.

'एक सनसनाटी बातमी आहे.' बुवांचे नेहमीचे ठरलेले वाक्य.

आणि मग फायलेरियाच्या गलेलठ्ठ डासासारख्या हस्ताक्षरातील फुलस्केप कागदावर लिहिलेली ती तीन तावांची बातमी बुवा माझ्या हाती देत.

बुवांची समजूत कशी घालावी याचा मला नेहमी विचार पडे. दुपारच्या रणरणत्या उन्हात ते मला एकदा कामण-साजरामोरी-ससुनवघर भागात घेऊन गेले. कुणाची जमीन कोण कशीत आहे, ७।१२ च्या उताऱ्यावर कुणाचे नाव आहे, कुणा वारली स्त्रीला कुणी विवस्त्र केले, कुणा भय्याने कुणा आदिवासीला मारले, कुणाची हातभट्टी कुठे चालू आहे, मुंबई अहमदाबाद रोडवरून कोण कशी वाहतूक करतो, कुणाचा स्मगलिंगचा धंदा आहे, विरार-वसई-वरून कोणते ट्रक सिरसाद नाक्यावरून भात घेऊन जातात, वसई खाडीवर लाकडाची चोरटी निर्यात कशी होते – याची नावनिशीवार माहिती बुवा देत होते. वस्तुस्थिती सिद्ध करणे कठीण असते हे बुवांना माहीत होते. तरीही त्यांना बातम्या छापून येण्याच्या घटनेवर फार विश्वास वाटत असे. त्यांना वाटे बातमी आली की लगेच जोरात हालचाल होईल. गुन्हेगार पकडले जातील. आदिवासींवरील अन्याय दूर होतील. गेल्या २५ वर्षातील माझा अनुभव मला सांगत होता यातले काहीही होणार नाही.

बातमी प्रसिद्ध होताच संपादकांना सचिवालयातून फोन जातात. वार्ताहराला कानपिचक्या मिळतात. त्याच्यावर हेत्वारोप केले जातात. आणि मग निष्कारण कटुता निर्माण होते. त्या वार्ताहराविषयी पद्धतशीर गैरसमज होतात. त्याचे वार्ताहरत्त्व रद्द होते. अन्य बातम्यांनाही काट मिळते. हे सारे बुवांना मी अनेकदा समजावून सांगितले होते. माझे कटु अनुभव निवेदन केले होते. ग्रामीण भागातील वार्ताहराला कुणाचेच संरक्षण नसते. मग बुवांनी स्वतः पत्रे लिहायला प्रारंभ केला. आम्ही थकलो व वृत्तपत्रसृष्टीतून मावळलो. तरीही बुवा येत – यावर लिहा, त्यावर लिहा, म्हणून सांगत. हे कुणी छापणार नाही अशी माझी खात्री असे. एकादी बातमी प्रसिद्ध झाली की तिचे दुष्परिणाम वार्ताहराला भोगावे लागत. बुवांना हे पटत नसे.

बुवांना कोणतीच गोष्ट पटत नसे. सत्य आणि जीवन यांची सांगड घालणे म्हणण्यापेक्षा व्यवहार म्हणून पाहणे एक दिव्य आहे. तरीही बुवांचा वृत्त-

पत्रांवर विश्वास.

बुवा एक कलंदर जीवन जगत होते. निरक्षर, अडाणी, अज्ञानी-भित्र्या आदिवासी जमातीला त्यांनी शूर बनविण्याचा प्रयत्न चालविला होता. आदिवासींच्या जमिनी बळकाविणाऱ्या सधन शेतकऱ्यांचा एक संघटित गट बुवांना विरोधी बनू लागला होता. राजकीय कार्यकर्त्यांचे हातही त्यात लडबडलेले असत. त्यांनीही अशाच जमिनी लाटल्या होत्या. बुवांकडे या लोकांची जंत्री होती. बुवांना याची संपूर्ण जाणीव होती. निवडणुका जवळ आल्या की हे लोक बुवांकडे जात. काँग्रेसवाले समजत होते बुवा कम्युनिस्ट आहेत. समाजवादी सांगत बुवा काँग्रेसकडून पैसे खातो. सारांश इतकाच की बुवांना माणसे जवळ करण्याची कला साधली नव्हती.

गेली दहा वर्षे बुवांचे जीवन मी जवळून पहात होतो. बुवा नेहमी गडबडीत असत. त्यांची कळकळ मला जाणवत होती. आदिवासी विभागात काम करणाऱ्या कोणत्याही कार्यकर्त्याने हालअपेष्टा भोगल्या नसतील एवढ्या हालअपेष्टा बुवांनी सहन केल्या. एकाकी लढत दिली आणि आहुतीही दिली.

बुवाची दाढी छातीपर्यंत रुळत होती. केसांच्या जटा झालेल्या होत्या. अंगात खांद्यावर फाटलेले बनियन असे. ढोपरापर्यंत गुंडाळलेली लुंगी. हातात फाईल व कागदपत्रे यांनी भरलेली पिशवी अमायची पायाला भिंगरी लागलेली होती. ठाणे, भिवंडी-वसई-पाये-ससुनवघर-सारजा, मोरी-कामण-आदिवासी विभागात पूर्व भागात गेली दहा वर्षे बुवा एकाकी लढत होते. आदिवासींना समजून घेत होते. मिळेल ते खावे नाहीतर चक्क उपास काढावा. एकदा बुवा पाव व उसळ खात होते. मला म्हणाले 'हेच आजचे आमचे भोजन' माझ्या डोळ्यात टचकन पाणी आले.

वैयक्तिक जीवनाचे होमकुंड सारखे धगधगत ठेवले होते. बुवा दूर कुठेतरी रत्नागिरी जिल्ह्यात परुळे गावात जन्मले होते. त्यांनी व्यक्तिगत माहिती कधीच कुणाला दिली नाही. ते कुठे वाढले, कसे जगले, शिक्षण किती याचा थांगपत्ता दिला नाही. वैयक्तिक जीवनातील एकही व्यथा त्यांनी माझ्याजवळ सांगितली नाही. पण बुवांनी जीवनभर हास्य मोकळे ठेवले. भरदार दाढीमिशांच्या जंगलातून बुवा मोठे मजेदार हासत. विनोदाचे त्यांना वावडे नव्हते.

---


**पुरंदरच्या बुरुजावरून**

**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य : चार रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**


---

'बुवा' तुम्ही दाढी काढा' मी एकदा म्हणालो.

'मग मला बुवा कोण म्हणणार ?' बुवा मन पोकळेपणाने हसले.

गेली दहा वर्षे या माणसाने आदिवासींचाच संसार केला. बुवांच्या जीवनात डोकावण्याचा मी प्रयत्न केला पण तळ कधीच गाठता आला नाही. आदिवासींच्या जीवनात हा माणूस इतका रमून गेला होता की त्याच्या अंतर्मनात सलणाऱ्या शल्यांची त्याला आठवणही होत नसावी.

पावसाळा संपत आला तरी आकाश काळ्या कुट्ट मेघांनी भरून गेले होते. उगाचच उदास वाटत होते. मन अस्वस्थ झाले होते. प्रभाकर म्हात्रेने बुवाचा निरोप आणला होता. २० तारखेला कामणला जायचे ठरले होते. बऱ्याच दिवसांनी बुवांची गाठ पडणार होती. बुवांनी आदिवासींची शेते कापण्याचा नवा प्रकल्प हाती घेतला. जबरदस्तीने आदिवासींची शेते लावणाऱ्या या लुटारूंना धडा शिकविल्याचा व आदिवासींची अस्मिता जागी करण्याचा बुवांचा हा प्रयोग होता.

स्वातंत्र्योत्तर कालातील हा एक अहिंसक आणि कायदेशीर प्रयोग होता. पोलीस हतबल झाले होते. सावकार गर्भगळीत झाले होते. कुणालाच काही करता येत नव्हते. बुवांची ही युक्ती बिनतोड होती. कुळं म्हणून ज्याचा सर्व्हे नंबर होता तोच आपल्या शेतातील पीक कापीत होता. हे कृत्य कायदेशीर होते. स्वत: कूळ जातीने उभे राहून आपले पीक कापून घेत होते. त्यांच्या दारिद्र्याचा–अज्ञानाचा–भित्रेपणाचा फायदा घेणारे लुटारू–सफेदपोश–दरोडेखोर हे उघड्या डोळ्यांनी पहात होते. पण कुणीही काहीही करू शकत नव्हते. हा बुवांचा प्रयोग यशस्वी होत होता आणि नेमके हेच खुपत होते साऱ्यांना.

एकादा झरा जसा डोंगरावरून खळखळ खाली येतो तसे बुवांच्या चेहेऱ्यावर स्मित झळकले. आदिवासींना आनंद झाला.

आणि दिनांक १७ च्या वृत्तपत्रात बातमी झळकली 'बुवा सामंत यांचा गोळ्या घालून निर्घृण खून ? सनसनाटी बातमी आली होती. जीवनाच्या प्रवासात कुठे ना कुठे तरी आपणा सर्वांच्या वाटा फुटतात. शेवटी ज्याला त्याला आपापल्या वाटेनेच पुढे जावें लागते. या जगात जिवलग व्यक्तीचेही निरोप घ्यावे लागतात, अकाली आणि कायमचे.

स्नेहबंधने तुटली तरी मनाच्या गाभाऱ्यात बुवांची मूर्ती भरून राहिली आहे. बुवा निवांत झोपले होते. त्या दिवसाचे त्यांचे काम संपले होते. काळालाही त्यांना सामोरे जायचे धैर्य झाले नाही. तो पाठीमागून आला. काडतूस उडाले. २ छरे पडले दोन बाजूला. ५२ छरे पाठीतून निघाले. वर्षाच्या ५२ आवठड्यासारखे. शेजारी बॅटरी व काड्याची पेटी पडली होती. बुवा आता बोलणार नव्हते. सनसनाटी वृत्त देणार नव्हते. ● ● ●

# हिंचगिरीचा महादेवाप्पा देवरू

बाळ महाजन, जत

मला त्याचे सारखे आश्चर्य वाटायचे ते याचसाठी की, तो माणसासारखा जगला नाही म्हणून.

मी तरी त्याला पुरता कधी पाहिला होता? एकदा ओझरता पाहिला तेव्हा पोलीसकचेरीच्या बाहेर उभ्या असलेल्या काळयाशार ॲम्बॅसॅडरमध्ये तो होता. होता म्हणजे कसा, तर हिंदी सिनेमातल्या टकल्या बॉससारखा पाठीमागच्या सीटवर बसला होता. त्याचा गुंडगुळा ओबडधोबड तुकतुकीत चेहरा, हनुवटीवर पांढरे काळे दाढीचे राठ खुंट; आणि डोकीवर एक कसनुसी बिनघडीची टोपी. खरी बात ही होती, की मागल्या सीटवर त्याचे ते धूड एकटेच मावत होते. त्याची गाडी लिंबाच्या झाडाखाली उभी होती. बाहेर ड्रायव्हर विडी फुकित होता. आणि ८।१० माणसे गाडीभोवती घरंगळत होती.

हे होतानाच मी आपला गरिबामारख्या त्याला निरखून घेत होतो. एवढयात खोजानवाडीचे सरपंच आले, आणि त्यांनी मला ओढीतच त्याच्यापाशी नेले तर तो फक्त मोठयांदा हसला. असा हसला की, त्याच्या हसण्याने गाडी थरथरायला लागली. खरे तर मला दरदरून घामच फुटायचा.

—तर सरपंचानी माझी त्याच्याशी ओळख करून दिली. अलिकडे अशी माणसे पाहिली की, नाक, कान, डोळे मिटून घेतो. याने मनात आणले तर तो मला कच्चा खाऊन टाकील. थोडया वेळाने त्याची गाडी हलली, तेव्हा त्याच्या ओझ्याने गाडीचा चक्काचूर तेवढा व्हायचा बाकी असतो. याला पाहिल्यावर त्याचे कपडे शिवणाऱ्या शिप्याचे कसे? म्हणजे त्याला माप घेताना वडाच्या बुंध्यागत याला प्रदक्षणा घालावी लागणार. बरे, याची चप्पल बाजारात कुठून मिळणार?

या माणसासंबंधात नंतर मला बरेच समजले.

'हा साला, एक नंबरचा दरोडेखोर आहे.'

'याने छप्पन्न खून केलेत.'

'याला पाहिले की पोलीस चळाचळा कापतात.'

एकाने तर सांगितले की, 'पोलिसांनी

याला गराडा घालून पोलीस व्हॅनमध्ये बेड्या अडकवल्या तर त्याची फुले बनली.' मला आत्तापर्यंत क.नेटकरांच्या अश्रूंचीच फुले होतात एवढे माहीत होते.

आता तुम्हाला पटले असेल की हा कोणीतरी भयंकर माणूस आहे.

ही मी काही हिंदी सिनेमातली सस्पेन्स स्टोरी सांगत नाही.

हे काहीच नाही. चारू मुजूमदार, कानू सन्यालसारखी याचीही एक दुनिया आहे. त्या दुनियेत जायला आपल्यासारखी भ्याड माणसे घाबरतात; कारण तिथल्या मातीत बंदुका आणि स्टेनगन् पेरलेल्या असतात. तिथे पोहचण्यापूर्वीच त्याची तळघरात रवानगी होते आणि नंतर ???

आता या भागातील प्रत्येक गावात याचे कोणीना कोणी असतेच. सारे त्याला देवरू म्हणतात. देवरू म्हणजे देव. हा देव कसा? खून करणारा, दरोडे घालणारा, पोलिसांना चळाचळा कापायला लावणारा देव कसा?

मग मी या देवरूला भेटायचे ठरवतो. मी, खोजानवाडीचा सरपंच बेळगी, संगप्पा, सुतार आणि संतू जायचे ठरवतो.

ठरल्याप्रमाणे साऱ्यांनी मला भीती दाखवायची ठेवली नाही. मी म्हटले, भडव्यानी खुशाल घाबरावे, आम्ही सडेफटिंग. आम्ही कोणाला घाबरून मुक्त नाही. बायकापोरे संभाळणाऱ्या बाप्यांनी वाटले तर कडीकुलपे लावून कोपऱ्यात बसावे. आम्हाला कसली फिकीर नाही.

आम्ही निघालोच. जीपने वेग घेतला होता. उघड्याबोडक्या रांडेसारखा दुष्काळ ओसाड माळरानातून वाहात होता. डोकीवर तळपता सूर्य, खाली डांबर वितळलेला रस्ता आणि गाडीचा रिपरिप आवाज.

आम्ही आता विजापुरात मुलूखमैदान तोफेजवळ आलेले असतो. घामाने व्याकूळ बनलेले चेहरे एका उडप्याच्या हॉटेलात खंगळून घेतो.

विजापूरपासून पुनः प्रवास. रस्ता मळका आणि खडबडीत. बाहेर मात्र बेफाम दृष्य. हिरवीगार झाडे, शेतातून पिके, आणि लमाणी स्त्रिया. एका मठाच्या कठड्यावर एक उफाड्याची पोरगी मांडी फासून बसलेली. वाटलं इथंच मुक्काम करावा.

प्रवासाला आता खरी सुरूवात होते. आम्ही हे सहा समंध कोठून आलो, कोठे चाललो, आमचे प्रयोजन काय, याचा काथ्याकूट न करता मी सिगारेट फुंकीत असतो. गाडी वेगात आणि झाडी दाट बनायला लागलेली. बाकीचे डुलकीच्या तंद्रीत दूर कुठतरी. गिरणीच्या धुराड्यातला आवाज तेवढा घुमतो आहे.

वेळ बरीच झालेली आहे. पलीकडेच गर्द झाडीतून डोकावणारी दोन गिर्जेबाज शिखरे डोकावताहेत. आम्ही एकूण नजिकच्या टप्प्यात आलोय. आता मनात धाकधूक वाढते. स्मगलरसारखे वेटोळ्यातले आमचे चेहरे काळवंडताहेत.

अचानक गाडी थांबते. रस्त्यावर एक भला थोरला लाकडाचा ओंडका. ड्रायव्हर बरोबर मी ही खाली उतरतो, तो काय आश्चर्य ? हातात कसले तरी पुस्तक धरलेला, खांद्यावर पिशवी टाकलेला आणि जख्खड म्हातारा असलेला आजोबा पुराणातल्या नारदासारखा मध्येच ठिवकतो. संतूशी तो खुणेनेच बातचित करतो. ओंडका बाजूला आणि गाडी पुढे चालू... रिप... रिप...

कन्नूर मागेच राहिलेले असते. गाडी वळणे घेऊन घामाघूम झालेली. आता शिखरे चांगलीच जवळ आलेली. त्या दोन शिखरातून डोकावणारे आणखी एक बादलीच्या आकाराचे निमूळते मम्मूच्या नाकाला चिटकणारे तिसरे शिखर मध्येच डोकावत असते. केळीच्या बागा, निलगिरीची झाडे, चिंच, आंबा, फणस, लिंब आणि इतर कितीतरी वृक्षांची नवलाई. मन प्रसन्न होऊन जाते आणि भीतीने गारठूनही जाते.

दोन काठीच्या कामटीला एक कापडी बोर्ड टांगलेला. त्यावर कन्नडमधून काहीबाही बरेच खरडलेले. चारु मुजूमदारची नगरी अशीच होती का ?

## हिंचगिरी

किती सुंदर नाव.

ही वाडी माणसांची, माणसासाठी वसलेली.

ही त्या अॅम्बॅसॅडरमधल्या टकल्या बॉसची कर्मभूमी, जन्मभूमी.

४२ च्या लढ्यात इथल्या मातीच्या कणाकणातून क्रांतीची बीजे पेरली गेलेली. क्रांतीसिंह नाना पाटलापासून रत्नाप्पाण्णा ते कॉ. डांगेपर्यंत सारेजण इथं येऊन गेलेले. कॉ. डांगेचे या इथे भाषण होते. मला त्या जागेचे चुंबन घ्यावे वाटते.

महाराष्ट्र-म्हैसूरच्या सीमारेषेवर एका घनदाट जंगलात इंडी तालुक्यात वसलेली ही हिंचगिरी केवढीशी. पण तिने इंग्रजांना आणि आपल्या मायबाप सरकारलाही चळाचळा कापायला लावलेले असते.

या टकल्या बॉसचे नाव महादेव्वाप्पा देवरु. कर्नाटकाचा क्रांतीसिंह आणि जमीनदार, भांडवलदार हस्तकांचा कर्दनकाळ. ४२ च्या लढ्यातला सेनानी नेताजी बोसांचा चहाता. हुबळीच्या मठात नेताजींची तैनात राखणार ४२चा लढा आणि महादेव्वाप्पा हे समीकरण जुळल्याशिवाय स्वातंत्र्याचा इतिहास खरडताच येणार नाही. आमच्याबरोबरचा वेळगी, संगाप्पा हे त्याकाळचे त्याचे साथीदार.

स्वातंत्र्यापूर्वी आणि त्यानंतरही या हिंचगिरीच्या रानारानातून बंदुकीच्या फैरी झाडणारे शेकडो शेतकरी घेऊन या महादेवाने सारा भूभाग हादरवला. ब्रिटिश गेले आणि नवी अवलाद त्याच तोऱ्यात मिरवू लागली.

स्वातंत्र्य मिळाले. परंतु त्या गरीब किसान कामगारांच्या तोंडी नसलेला घास त्यांना मिळाला का ? त्यांच्या बाया-बापड्यांच्या अंगावर टेकवायला वीटभर चिंधी राहिली का ? दिसरात राबराब राबून कासोट्यात अडकवा-


सांगायलाच् हवं का?
SATHE MALTEX BISCUITS
SATHE MALTEX BISCUITS
ताजी, कुरकुरीत व रुचीला आगळीच - वा! ही तर साठे माल्टएक्स बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता माल्टमुळेच या बिस्किटात आहे. पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली माल्टएक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!
heros'-SBC-49C MAR

यला त्याच्यापाशी दिडकी तरी राहिली काय ? मग कसले स्वातंत्र्य ? कोणाचे स्वातंत्र्य ??

महादेव्वाप्पा व्याकूळ होऊन उठला. क्रांतीचा वारा प्यालेला हा माणूस धगधगत्या ज्वालामुखीसारखा पेटून पेटून उठला. क्रांतीच्या तप्त लोळांनी किसानांच्या डोळ्यातले निखारे फुलले. वैफल्याने ग्रासलेला महादेव्वाप्पा हातामध्ये शस्त्रे घेऊन किसानांचे जथेच्या जथे उभारू लागला. जमीनदारांच्या घरावर डाके पडू लागले, सावकारांचे दिवसा ढवळ्या खून पडू लागले. जमीनदार, भांडवलदारांचे हस्तक याने भांबावले, चक्रावले. पोलिसानी संगिनी रोखल्या. हिंचगिरीचा टापू गोळ्यांच्या आवाजांनी आणि मृत्यूच्या किंकाळ्यांनी दुमदुमू लागला. हा नक्षलवाद्यांचा बाप इथे अवतरला.

६३ सालापूर्वी अंकलगी, ककमरीवर, दिवसाढवळ्या डाके पडले. सरकार हादरले. पोलिसांचे तर्फे महादेव्वाप्पाला जळीस्थळी शोधू लागले. यातही एक टेक्निक् होतं. खेड्यापाड्यातून सावकारी करणाऱ्या आणि गोरगरीब स्त्रियांच्या शीलावर दरोडे घालणाऱ्या सैतानी नराधमांची यांनी एक यादी बनवली. त्या सैतानी, सत्ताबाज, संपत्तीच्या टेंभ्यात मिरवणाऱ्या चवचाल बाजार बुणग्यांना चिठ्ठी पाठवून समज दिली जाई. त्याने जमले नाहीच तर त्याच्या घरावर डाका पडलाच. वाटलेच तर खून. बाबूराव अर्नाळकरांनी एका पानात तीन खून घालून कादंबरी रचावी तशीच ही घटना; भयानक आणि भयावह.

हे करीत असतानाच हा माणूस सध्याचे राज्यपाल श्री. बी. डी. जत्तीं-विरुद्ध दोनदा जमखिंडीतून आमदारकी-साठी उभा ठाकला. प्रत्येक वेळी थोडक्यात अपयश. परंतु जत्तींनीही याच्या लोकप्रियतेपुढे हात टेकले.

अंकलगी खटल्यात, ककमरी खटल्यात हवा असलेला हा सरकारच्या बक्षीसयोजनेतला दरोडेखोर पकडायला मातब्बर पोलीस अधिकाऱ्यांबरोबर शेकडो पोलिसांनी हिंचगिरीला वेढा घातला आणि अखेर हा वाघ पोलिसांच्या जाळ्यात अडकला.त्यानंतर पोलीस, जेल, कोर्ट आणि अवहेलना यांनी त्याची पाठ धरली.

याने नंतर मार्ग बदलला. हा लाटे-बरोबर इंदिरा कॉंग्रेसमध्ये घुसला. देशातल्या समर्थ पोलीसदलाविरुद्ध लढून क्रांतीची भाषा बोलणे व्यर्थ आहे हे त्याने ओळखले आणि तो अध्यात्मा-कडे वळला.

एका हातात शस्त्र दुसऱ्या हातात अध्यात्म घेऊन हा किसानांना जागृत करू लागला. भूदान, सर्वोदयाचे काम करू लागला. एकीकडे प्रचंड शस्त्रागार सांभाळीत याने देवळे उभारली, रामदास, दासबोध, . तुकाराम आणि गाथा यांची कन्नडभूमीत मराठीतून सेवा रुजू केली. परवा गुंडेवाडीला याचे दासबोधावरले रसाळ मराठीतले कन्नड-भाषिकांपुढले प्रवचन ऐकून चाटच पडलो.

हिंचगिरीच्या भूमीत याने आश्रम उभारला. भव्य आणि वेगळा. देशातल्या कानाकोपऱ्यातली उपेक्षित आणि चोर दरोडेखोर म्हणून समाजाने दूर लोटलेल्या शेकडो लोकांना आसरा दिला. सरकार अशा लोकांना तुरुंगात डांबून त्यांच्याकडून खडी फोडून घेते. परंतु महादेवाप्पाने त्यांना तिथल्या माळरानावर शेती करायला शिकविले. त्यांनी नांगर चालविले, ते राबले, त्यांनी मेहनत, कष्ट केले आणि शेते पिकविली. अन्नधान्याची संपन्नता आली. ते खाऊपिऊ लागले. सामूहिक शेतीचे सहजसुंदर प्रात्यक्षिक इथे घडू लागले. आज इथे सातशे कुटुंबे राबत आहेत. इथली शेती त्यांची साऱ्यांची आहे. त्यांच्या कष्टातून ९ ट्रॅक्टर, ३ मोटारी, ५ जीप्स् वावरताहेत. ही अद्‌भूत किमया करणारी माणसे एकेकाळी चोर-दरोडेखोर होती हे आज कुणाला पटेल काय ? मी त्यांना बांधून देण्यात आलेल्या चाळीचाळीतून हिंडलो, कळाप्पा बस्साप्पा सुतार. सिंदी कुरुबेट या ठिकाणाहून आलेल्या या गृहस्थाचा जनाबी कगनोळी या तिथल्याच आसऱ्याला आलेल्या मुसलमानबाईशी आंतरजातीय विवाह घडतो. तिचे नाव जनाबाई ठेवतात. त्या दोघांची मुलगी गिराबाई. तिचे मारुती वडार या तरुणाशी लग्न होते. हे एक उदाहरण म्हणून. आंतरजातीय विवाहाचे अपवादात्मक उदाहरण घडले की, पेपरातून जाहिरात करणाऱ्यांना इथं सारेच आंतरजातीय विवाह घडतात हे ऐकून खात्रीने मूर्च्छा येईल. इथे कसली जात नाही, धर्म नाही, देवळात पुजारी नाही, की कसला म्हणून मतभेद नाही. समान न्याय, समान वाटप. घंटा झाली की जेवण आणि ठरवून घेतलेले काम. सामूहिक भोजनाचा थाट तर अनोखा. भटारखान्यात साऱ्यांचे अन्न दोन काहिलीत शिजत ठेवलेले असते. रात्री भजन, कीर्तन, वाटलेच तर वंदुकांचे प्रात्यक्षिक. असे हे विविधांगी, विविध




रंगी, रंगाढंगाचं जग पाहून मी तर चकितच झालो. आतापर्यंत साऱ्यांनी ज्याची दरोडेखोर, खुनी म्हणून संभावना केली त्या महादेवाप्पाचे हे कुटुंब. या कुटुंबातली कित्येक पोरे शहरातून मोठमोठ्या कॉलेजात आहेत. शिकायचे तर फुल कोरमपर्यंत शिका. पैसा महादेवाप्पाकडून घ्या.

—तर अशा या माणसाची ही दुनिया पाहून मला त्याच्या दर्शनाची आस लागते. याला मी चहूकडे निरखीत असतो. हा कुठेच दिसत नाही. इथं चहूबाजूला आता माणसांचे थवे वाहताहेत. जत्रेची शोभा यावी तशी मांडव, तोरणे उभारून शोभा केली आहे. बाजूलाच एका मांडवापाशी गर्दी जमलेली लिंबांच्या पाराखाली हा बसलेला. एक लाकडी पाट त्यावर माणसे बसलेली. २।३ रिकाम्या खुर्च्या. त्यावर कोणीच बसलेले नसते. आजूबाजूला बरीच गर्दी. समोर एक टेबल. त्यावर खाण्याचे सारे पदार्थ ठेवलेले. त्यात गऱ्याचे लाडू, केळी, चिवडा, पेढे, मलीदा, कांदापोहे इ. इ. आणि त्याला रेलूनच हा एका जाडशा लाकडी खूर्चीवर बुड टेकवून बसलेला. केवढा मोठा हा माणूस ? काय वजन भरेल याचे ?

तर हा आपला बकासुरासारखा बकणा भरीत असतो. मुठीमुठीने याच्या तोंडाचा तोबरा गच्च झालेला. अंगावर साधेसे खादीचे मळकट कपडे, निमूळता अरबी चेहरा, राठ हनुवटी, खोलगट, लुकलुकणारे निळेशार डोळे आणि प्रसन्न हास्य. तो खातानाच येणाऱ्या जाणाऱ्याशी नावानिशी बोलत असतो. हा प्रत्येकाला त्याच्या नावाने कसा ओळखतो ?

असे घडतानाच तो खुणेनेच आम्हाला बसवितो. आमच्या पुढ्यात खादीचे पुडे येतात. आपण खातोच, आम्हाला खायला लावतो. माझ्याकडे त्याचे एक टक पहाणे चाललेले. मला त्याच्या बद्दल मोठे कुतुहल आणि आम उमाळा. याचे आणि माझे पूर्व जन्मीचे काही


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

नाते तर नाही ना ?

सांगायचे राहिलेच. याच्या पायाशी एक पिशवी असते. त्यात बरेच पैसे येणारे जाणारे काहीना काही नोटा टाकीत असतात. आमच्या बरोबरच्या बेळगीने तर शंभराच्या चार नोटा टाकल्या. आपण शहाणे लोक हे पाहून समजणार की हा साला बुवाबाजीकरून पैसे लाटीत असणार. तर हे काही खरे नसते. याने या साऱ्यांना हजारोंनी रुपये मुक्तपणे दिलेले असतात. संगप्पाच्या गिरीश फार्मला ८० हजार रुपये, खोजानवाडीच्या एका शेतकऱ्याला बैलजोडीसाठी दोन हजार तर गोकाकच्या एका गृहस्थाचा ट्रक सांगलीत अडकलेला असतो त्याला ४५ हजार, असा हा माणूस माणसांना मदत करीत असतो. त्याला त्याची ही गोरगरीब जनता मोठ्या श्रद्धेने अशा समारंभानिमित्त पैसे गोळा करून देत असते.

याच्याशी बोलताना हा पदोपदी देशाचे वाटोळे झाले म्हणून काँग्रेसवाल्यांना चक्क मराठीतल्या शिव्या हाणीत असतो. १९३४ सालीच याने हिंदुस्थानच्या फाळणीचे भविष्य वर्तवले. त्याला रशिया-भारत करार आवडत नाही.

या महादेवाप्पाची कर्तुमकर्तुम कीर्ती ऐकून श्री शैलचे परमहंस स्वामिजी आपल्या MEL 2384 या अंबूसी रंगाच्या कारमधून इथे अवतरलेले असतात. २५ वर्षाचा हा तरुण ग्रज्युएट स्वामीजी फक्कड इंग्रजीतून आम्हाला अध्यात्माचा डबलडोस पाजतो, परंतु आपण त्याच्या कपड्यांना निरखीत राहतो.

आता संध्याकाळ ठेपलेली असते. संध्याछाया अवतरल्या आहेत. आम्ही काढता पाय घेतो; तर कोणी सांगत असतात या मठाच्या तळघरात हजारोंनी काडतुसे आणि बंदूकांनी भरलेले शस्त्रागार आहे. तिथेच आझाद हिंद फौजेतले त्याकाळचे दारूगोळा बनवणारे तीन मेस्त्री रहात असतात. वगैरे.

आम्ही परतीला लागलेलो असतो. गाडीने वेग घेतलेला असतो आणि महादेव्वाप्पाच्या प्रवचनाची सुरुवात झालेली असते. खरेच, एका हातात शस्त्र आणि दुसऱ्या हातात अध्यात्म घेऊन साठी ओलांडलेला महादेवाप्पा देवरू हे किती वर्षं चालवणार? विज्ञान आणि देशातील सुसज्ज फौजांशी तो कसा आणि कुठपर्यंत लढणार? परंतु आज महादेव्वाप्पा जगतो आहे, बोलतो आहे, कन्नडभाषिकात मराठी भाषेची थोरवी सांगतो आहे आणि शेतकरी कष्टकरी जनतेला जागृत करतो आहे.

गाडी बरीच दूर आलेली आहे, मानामध्ये मघांपासून नुसता जयजयकार घुमतो आहे. महादेबाप्पा की जय, की जय, की जय...

● ● ●

# मोठी धरणे

## अस्वान, व्होल्टा, भाकडा : काही अनुभव

प्रा. रा. म. बिवलकर

धरण म्हणजे वाहत्या नदीच्या मार्गात मानवी प्रयत्नानी उभारलेली एक प्रचंड भिंत. हा अडथळा उभा झाला की त्यामागे–नदीच्या वरच्या पात्रात–मैलोगणती प्रदेशात हे पाणी तुंबते. धरणामागे फार मोठा जलाशय निर्माण होतो. धरणाची उंची, नदीची जलवहन क्षमता, तिच्या उगमक्षेत्रात व धरणावरल्या पाणलोट क्षेत्रात पडणारा पर्जन्य, या गोष्टीवर हा जलाशय किती पाणी साठवील हे अवलंबून असते. वाहते पाणी सरळ समुद्राला मिळणार म्हणून त्याला अडवून नियंत्रित रीतीने वीज, शेती, उद्योग याकरता त्याला राबविण्याचा हा खटाटोप.

पण वाहते पाणी थांबले की सारेच बदलते. तुंबलेल्या पाण्याचे शास्त्रच वेगळे बनते. त्यामुळे धरणक्षेत्रातील वनस्पतीसृष्टी आणि प्राणीसृष्टी यातही किनीतरी बदल संभवतात. मानवी जीवन आणि त्याच्या पद्धती यातही खूपच बदल होतात. नदीच्या खालच्या अंगाच्या दोन्ही काठाच्या जमिनीची सुपीकता, क्षारमयता यातही बदल होतो. खूप मोठा जलसाठा निर्माण झाला की त्याचे भयंकर वजन पृथ्वीच्या त्या भागाखालील कवचावर पडते. दोन्ही कडेच्या डोंगर रांगावरही पाण्याचा विलक्षण दाव जाणवतो.

निसर्गाच्या मार्गात धरणप्रकल्प असे विविध बदल करतो. ते निसर्गाला एक आव्हानच असते. 'निसर्गाला आम्ही प्रतिरोध करीत नाही. त्याला आम्ही निराळ्या वाटा दाखवतो. मानवाच्या दिमतीला आणून बांधतो' हे एका स्थापत्य विशारदाचे विचार. भाकडा धरणावर मला तो भेटला होता. स्थापत्यशास्त्राची ती किमया मोठ्या अभिमानाने तो मला दाखवीत होता. जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या उंचीचे ते धरण. त्या मागला तो 'गोविंद सागर'. त्याची जलधारणा क्षमता, १२ लाख किलोवॅट वीज निर्माण करू शकणारी दोन्ही अंगाची वीजगृहे. नंगल हैडेल कॅनॉल. त्याखाली भिजू शकणारी १ कोटी एकर जमीन–भाकडामुळे

संपन्न होणाऱ्या पंजाबचे केवढे विलक्षण सुंदर चित्र त्याने माझ्यापुढे उभे केले होते !

पण आता विचार करताना मनात येते, 'एस्टीमेटस्' आणि 'अॅक्चुअल्स्' यात धरण बांधणीनंतर किती फरक पडला? जलविद्युत्केंद्रे इन्स्टॉल्ड कॅपॅसिटीच्या ६०% वीज निर्माण करतात ! कालवे कॉंक्रीटने बांधले नाहीत तर झिरपणीमुळे जवळजवळ १/३ पाणी 'गुप्त' होण्याची शक्यता असते. हे गुप्त झालेले पाणी जमिनीतील 'वॉटर टेबल'वर उचलून, जलसिंचन क्षेत्रातील जमिनी नापीक, पाणथळ व क्षारमय करण्याचा धोका असतो. मुळात अपेक्षिलेले पाणी जलाशयात जमतच नाही वा त्यातले बरेचसे 'इव्हॅपोरेट' होऊ शकते. म्हणजे पुन: विजेकरता वा शेतीकरता अपेक्षित पाण्याचा साठा उपलब्ध होत नाही—जलाशयाची जलधारणा क्षमता प्रतिवर्षी वाहून येणाऱ्या गाळामुळे दिवसेंदिवस घटत जाते ती वेगळीच. ज्यांची वडिलोपार्जित घरेदारे, जमिनी जलाशयात बुडतात त्यांची पुढील जीवनात जी ससेहोलपट होते तिचा विचार तर अर्थशास्त्राच्या कक्षेत बसत नाही म्हणून करायचाच नाही !

खरोखर धरणामुळे अपेक्षित विकास खरेच साधतो का? आणि जर साधत नसेल तर?...

अलिकडच्या काळात जो एक धरणप्रकल्प जगात विशेष गाजला, त्या इजिप्तमधील आस्वान धरणाचेच उदाहरण घेऊ. या धरणाखालच्या विद्युत्गृहात प्रतिवर्षी निर्माण होऊ शकणारी दहा हजार दशलक्ष किलोवॅटअवर्स एवढी वीज औद्योगिकदृष्टचा मागासलेल्या इजिप्तला वापरताच येत नाही ! शक्तिसाधनाची निर्मिती—त्याच्या उपयोगाशी निगडित न झाली तर होणारा तोटा जमाखर्चात धरायचाच नाही का? आपल्या देशात तुंगभद्रेवरील धरण बांधून तयार झाले. पंपासरोवरात हवे तेवढे पाणी साठवले गेले. पण त्याचा वापर करणारी वीजकेंद्रे व कालवे पुढील दहा वर्षातही पूर्ण न झाल्याने झालेले नुकसान कुणी विचारात घेतले का?

आस्वान धरणामागच्या 'नासेर तलावा'ची जलधारणा-क्षमता १ लक्ष ६० हजार दशलक्ष घनमीटर्स एवढी आहे. आपला बहुतेक प्रवास वाळवंटातून करणाऱ्या निळ्या नाईलला शुभ्र नाईलशिवाय एकही मोठी नदी मिळत नाही. मग 'नासेर तलाव' कधीही पूर्ण भरत नाही यात नवल काहीच नाही. पण प्रतिवर्षी तो पूर्ण भरेल असे वाटून तलावाची ती क्षमता ठेवणाऱ्या स्थापत्यविशारदांच्या बुद्धीला तेव्हा भ्रम पडला होता का? नासेर तलावात जमणाऱ्या पाण्यापैकी १५ हजार दशलक्ष घनमीटर्स एवढे पाणी हवेत उडून जाते ! अपेक्षेपेक्षा पन्नास टक्क्यांनी इव्हॅपोरेशनचे प्रमाण जास्त आहे का? तलावावरून खूप वेगाने वहाणाऱ्या वाऱ्यांचा वेग एस्टीमेटमध्ये विचारात घ्यायचे म्हणे राहून गेले ! नाईलच्या पश्चिम किनाऱ्याचा ५०० किलोमीटर्स

एवढा भाग न्युनियन सॅण्डस्टोनचा असल्यामुळे, नदीचा तो किनारा नासेर तलावातील आणखी १५ हजार दशलक्ष घनमीटर्स पाणी पिऊन टाकतो ! याचा अर्थ नासेर तलावात नाईल प्रतिवर्षी जेवढे पाणी आणून ओतते त्यातला १/३ भाग असा 'गुप्त' होतो ! त्यामुळे नासेर तलाव जे अफाट वाळवंट फुलवणार होता तेवढे वाळवंट फुलायला पुरेसे पाणीच उपलब्ध होत नाही. धरणाखालच्या प्रदेशाला नाईलच्या पुरापासून संरक्षण मिळाले, निळया नाईलचे सुंदर दृश्य नेहमीचे झाले, पण हीच वेडी नाईल १०० दशलक्ष टन सुपीक गाळाची माती आणून आपल्या दोन्ही काठांवर पसरीत असे. त्यामुळे खूप उत्तम पिके येत. आज तो १०० दशलक्ष टनाचा गाळ प्रतिवर्षी नासेर तलावात साठत आहे. त्याची जलधारणा क्षमता घटवीत आहे. उलट नाईलच्या गाळामुळे पिकणाऱ्या अडीच दशलक्ष हेक्टर जमिनीत आज प्रतिवर्षी ७३ कोटी रुपयांची निरींद्रिय खते ओतावी लागत आहेत.

धरणाखालच्या प्रदेशातील कालव्यातील पाणी झिरपणीमुळे ४ लक्ष हेक्टर जमिनी पाणथळ बनल्या आहेत. त्या पाण्याचा निचरा करण्याकरिता १४६ कोटी रुपये फस्त करणारी ड्रेनेज स्कीम आखावी लागली आहे.

जगातील अनेक धरणांनी जेवढी जमीन पाण्याखाली आणली आहे त्यापेक्षा अधिक चांगली सुपीक जमीन त्या धरणामागच्या तलावांनी गिळली आहे. सुपीक जमीन, मौल्यवान वनस्पती, साग, बागायती पिके, जुनी वास्तुशिल्पे, गावे, शहरे आज त्या तलावांच्या तळाशी जाऊन बसली आहेत. नासेर तलावात वाडी हाल्फा हे सुदानी शहर बुडाले. घानामधील व्होल्टा डॅमखाली उत्तम शेतजमीन गेली. आयव्हरी कोस्टमधील कोसु डॅममध्ये कोको आणि कॉफीच्या बागा बुडाल्या. भारतातील नागार्जुन सागर धरणाखाली, प्राचीन भारताच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या इक्ष्वाकु वंशातील राजांच्या विजयपुरी नामक राजधानीला जलसमाधी मिळाली आहे. नागार्जुनाचार्यांसारख्या रसायनशास्त्रज्ञाच्या नागार्जुन कोंडा नामक बौद्ध विद्यापीठाचे अवशेष त्यात गडप झाले आहेत.

धरणांच्या जलसिंचन क्षेत्रात पसरलेल्या कालव्यांनी जलवाहक रोगांचा प्रसार महाभयंकर प्रमाणात चालविल्याचे पुरावे अनेक देशांतून पुढे येत आहेत. कालव्यांचे प्रदेश मलेरिया–फायलेरिया–पिवळा ताप या रोगांचे जंतू वाहणाऱ्या डासांच्या जाती पोसतात. त्यामुळे हे रोग अनेक ठिकाणी शिरजोर झाले आहेत. आपल्या देशातही काही वर्षापूर्वी नेस्तनाबूत झालेला मलेरिया भारताच्या विविध राज्यात डोके वर काढीत आहे हे मलेरिया प्रतिबंधक उपाय योजणाऱ्या खात्याचे अहवालच सांगत आहेत. खेडोपाडी नारूसारखे रोग माणसांना पुन: जायबंदी करू लागले आहेत. चार महिन्यात, बिल्हारझिॲसिस नामक रोगाच्या

जंतूंची ५० हजार पट वाढ आपल्या पोटात करणाऱ्या गोगलगाईंची संख्या आस्वान धरणाच्या जलसिंचनक्षेत्रात महाभयंकर प्रमाणात वाढल्याने इजिप्तच्या तीन कोटी लोकांपैकी १ कोटी ४० लक्ष लोक या रोगाने हवालदील झाले आहेत. दिवसाकाठी ३ तास काम करणेही त्यांना शक्य होत नाही एवढी त्यांची कार्यक्षमता घटली आहे. मानवी कार्यशक्तीची ही हानी दुर्लक्षिण्यासारखी खचीतच नाही.

धरण उभे राहिले की नदीपात्रात बसलेल्या तुंब्यामुळे धरणामागे मैलोगणती पसरणाऱ्या जलसागरात – त्या भागात राहाणाऱ्या माणसांची घरे-दारे शेतवाडी, जमीनजुमला-मालमत्ता सर्व बुडून जाते, या गोष्टीचा वर उल्लेख केला. पण या घटनेत फक्त वास्तू व मालमत्ता यांचेच नुकसान धरणे आर्थिकदृष्टचा बरोबर असले तरी आपली वाडवडिलार्जीत घरेदारे-जमीन, सोडून परांगदा व्हावे लागणाऱ्या हजारो-लाखो कुटुंबांच्या मानसिक धक्क्याचा व त्यातून संभवणाऱ्या हानीचा विचार धरणप्रकल्पात कधीच केला जात नाही. बहुसंख्यांकांच्या सुसंपन्नतेकरता, काही थोडचांनी त्रास सोसून, विकासाची वाट मोकळी करून दिली पाहिजे, ही गोष्ट खरी असली तरी कित्येकदा नदीच्या खालच्या बाजूस जमीन असणारेच एका रात्रीत बागायती शेतीचे धनी बनतात. राष्ट्रीय पातळीवरचा प्रकल्प अशी काही थोडचांचीच धन करतो. त्यांच्या जमिनींच्या किमती वाढतात. ते दोन दोन तीन तीन नगदी पिके घेऊ लागतात.काही वर्षातच लखपती बनतात. पण ज्या धरणाने त्यांना ही श्रीमंती आणून दिली त्याच्या बांधणीप्रीत्यर्थ एक तनसडीचाही त्याग त्यांनी केलेला नसतो. याउलट धरणामागच्या तलावात सर्वस्व बुडालेली माणसे, सरकारने त्यांच्या पुनर्वसनाच्या कितीही जाहीराती केल्या, तरी खऱ्या अर्थी पुनर्वसित केली जात नाहीत. जमीन मिळाली तर मिळाली, नुकसानभरपाई दिली तर दिली, घरे बांधायला साहित्यही मिळते न मिळते अशी त्यांची अवस्था होते आणि ही मंडळी देशोधडीला लागतात.

‘आमची घरे बुडवून त्या ऐतोबांची घरे सरकारने भरली यातला अन्याय विरोधी पक्षांनाही दिसत नाही. आम्हाला नवजलसिंचित भागातील जमीन का मिळू नये ? त्या मंडळींकडून सरकारने धरण बांधणीचा खर्च का वसूल करू नये ? विहीर बांधण्याकरता तगाई देता ती वसूल करता की नाही ? मग हे तसेच नाही का ?’ धरणामुळे परागंदा व्हावे लागलेल्या एका गृहस्थाचे हे उद्‌गार दुःखावर नेमके बोट ठेवतात यात शंका नाही.

आफ्रिकेतली काय आणि या देशातील काय पुनर्वसाहित मंडळी दुखावली गेली आहेत. त्यांचा जोम संपला आहे. आत्मविश्वास हरपला आहे. त्यांना बसलेल्या मानसिक धक्क्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी झाली आहे. घानामधील व्होल्टा धरणाच्या पुनर्वसा-

हितांचा 'डेथ रेट' वाढला आहे. कुणी सांगावे, आपल्या देशातही तशी विशेष पाहाणी झाली तर तोच अनुभव नोंदला जाईल.

या देशात हैदोस घालणारी लाचलुचपत धरण बांधणीच्या कार्यात कहर करते हे उघडे गुपीत आहे. नाहीतर, धरणबांधकामावर डेप्युटी इंजिनियर म्हणून बदली होण्यासाठी लोकांना संबंधीतांना २०–२० हजार रुपये चारावे लागतात, ही म्हैसूर राज्यातली मध्यंतरी प्रसृत झालेली कथा काय सांगते? म्हणजे पुन: इतक्या लोकांचे जीवन उध्वस्त करून उभे राहाणारे धरण कच्चे असणार, कधीतरी अचानक वाहून जाणार, पानशेतने पुण्याचे केले तसे – नदीखालच्या भागाचे अकस्मात नुकसान करणार, वा सिल्टेजचा अंदाज न आल्याने, टेक्सासमधील 'लेक-ऑस्टिन' जसे १३ वर्षांत गाळाने सपूर्ण भरले जाऊन कुचकामी झाले तसे तरी होणार. मग निसर्गाशी – वनस्पती-पशु-मानव यांच्या जीवनाशी–हा जीवघेणा खेळ तरी का? पृथ्वीच्या कवचाला तो पाण्याचा भार असह्य झाला तर ती धरणीकंपी उसळी मारून मानवाची ही नसती उठाठेव क्षणात रद्दबातल करील ही भीती आहेच.

धरणे बांधण्याचे गुणगान जगात सुरू झाले. मोठमोठ्या धरणांनी येऊ घातलेल्या समृद्धीचे आकडे डोळ्यापुढे फिरू लागले, आणि जगात धरण बांधणीचा 'मॅनिया' झाला. बड्या राष्ट्रांनी विविध उद्दिष्टे समोर ठेऊन तो पोसला. धरणे बांधायला त्यांनी कर्जे दिली, तंत्रज्ञ पुरवले, स्थापत्य पाठवले, यंत्रे आणून दिली. छोटी राष्ट्रे हुरळली. त्यांनी धरणांच्या भिंती उंचावीत नेल्या! त्यातून आर्थिक फायदे तर पदरी पडले नाहीतच, जनतेचा असंतोष, विषमता, अन्याय, अपहार पोसले गेले. कर्जे मात्र बोडक्यावर बसली. 'आस्वान' बांधण्यात आम्ही चूक केली असे इजीप्शियन मंडळी आता उघडपणे बोलू लागली आहेत. आमच्या देशातली मंडळी उघडपणे अजून बोलत नाहीत पण त्यांनाही बोलावे लागेल.

याचा अर्थ मोठी धरणे बांधूच नयेत असा नव्हे. धरणप्रकल्प हाती घेताना फायदा किती, तोटा किती, समस्या कुठल्या, त्या कशा सोडविल्या पाहिजेत, अन्याय कसे टाळले पाहिजेत, रोगराया बळावणार नाहीत म्हणून काय काय केले पाहिजे, या गोष्टींचा साकल्याने विचार व्हावा. आणि अगदी आवश्यकता असली तरच मोठे धरण बांधावे.

● ● ●

जगातील सर्वात मोठा लोहमार्ग काटणारी

# ट्रान्स सैबेरियन एक्सप्रेस

श्रीकृष्ण ठाकूर

उरल पर्वत श्रेणीमध्ये मास्कोच्या पूर्वेला ११०० मैलांवर ट्रान्स-सबेरियन रेल्वे धावत असते तिथे दोन बाण दाखविलेले आहेत. एक बाण पश्चिमेच्या दिशेनं दाखविलेला आहे व म्हटलं आहे 'युरोपकडे' दुसरा बाण पूर्वदिशा दर्शवितो व म्हणतो 'आशिया-कडे' इथून सैबेरिया सुरू होतो व सैबेरियाकडे जाणारे रशियन प्रवासी मागे युरोपकडे साश्रू नयनानी पहातात. कारण त्यांना माहित असतं की आता यापुढे युरोपचं दर्शन नाही. सैबेरिया म्हणजे भीती, दहशत व निराशा अशी त्यांची सार्थ भावना झालेली असते.

जे परदेशी प्रवासी टूरिस्ट म्हणून सैबेरियाला जातात त्यांना जमिनीचं हे प्रचंड दर्शन (सैबेरिया हा जगाच्या भूपृष्ठाचा जवळ जवळ एक दशांश भाग आहे.) म्हणजे अज्ञेय, भीती-दायक आणि अगम्य असा प्रदेश आहे असे वाटते. पण आता त्या प्रदेशाचा विकास सुरू आहे. जुन्या कल्पना वितळत आहेत. आता रशियन सरकार परदेशी प्रवाशांना केवळ परवानगीच देतं असं नव्हे तर सैबेरिया पहाण्याचं आमंत्रण देतं. त्याचमुळे १९६७ च्या उन्हाळयात मी सैबेरियाचा प्रवास केला. हा रेल्वेचा जगातील मोठयात मोठा प्रवास आहे, चमत्कारिक आहे आणि अत्यंत कमी खर्चाचा आहे. ग्रेट सैबेरियन ट्रॅन्झीट रूटनं मी जपानहून मास्कोला गेलो. प्रथम एका छोटयाशा रशियन जहाजानं मला जपानहून नाखोद्का येथे नेलं. नाखोद्का हे नवं सोविएट पॅसिफीक बंदर आहे. त्याचा विकास होत आहे. ब्लाडिव्होस्टॉकच्या पूर्वेला ६० मैलावर हे बंदर आहे. मग एका कनेक्टींग ट्रेननं मी सात दिवस व सहा रात्री प्रवास केला. ती रशियाची अभिमानास्पद गाडी ट्रान्स सैबेरियन एक्सप्रेस होती. जगातील सर्वांत लांबीचा रेल्वे प्रवास ही गाडी करते.

रशियाचा पूर्वेकडील भू-भाग सैबेरिया. चीन व भारत एकत्र केले तर सैबेरिया होईल. या सैबेरियातून एक रेल्वे मार्ग जातो. तो प्रचंड श्रमाने रशियाने बांधला. त्या मार्गावरून ट्रान्स-सैबेरियन रेल्वे ५८०० मैलांचा प्रवास करते. त्या प्रवासाला १५८ तास लागतात. ही एक्सप्रेस ठरलेल्या वेळी मास्कोला पोचते.

गॉर्डन कॅस्कील या अमेरिकन प्रवाशानं या एक्सप्रेसनं प्रवास केला तेव्हा ही एक्सप्रेस ९० सेकंद उशिरा पोचली म्हणून रशियन प्रवाशानं नाक मुरडलं. सैबेरियाची ही धावती ओळख वाचकांना आवडावी.

---

तो प्रवास जवळ जवळ ५८०० मैलांचा असतो.

जर तुम्ही अधीर नसाल तर हा प्रवास म्हणजे एक अविस्मरणीय प्रवास असतो. या गाडीवर मिळणारं जेवण मात्र सामान्य प्रतीचं असतं. या गाडीचे कंपार्टमेंटस् मध्ययुगीन प्रकारचे आहेत. सामान्यपणे तुमच्याबरोबर आणखी तीन प्रवासी असतात. त्यामुळे आपलं स्वातंत्र्य संपुष्टात येतं, खाजगीपणाचा लोप होतो. मात्र इतरांच्या संगतीचा लाभ मिळतो.

रशियन स्त्री-पुरुषांत मिसळण्याचा, त्यांच्याशी गप्पागोष्टी करण्याचा यापेक्षा सोपा मार्ग नाही. पूर्वेकडून युरोपला जाण्याचा हा सर्वात कमी खर्चाचा मार्ग. टोकियोहून मास्कोला जाण्याचं एकेरी इकानॉमी प्लेन तिकीट ११५४२ रुपये आहे आणि आता मी आलो या मार्गानं बोटीचा प्रवास, आगगाडीचा प्रवास आणि दहा दिवसांचा जेवण खाणाचा खर्च हे सर्व मिळून पहिल्या वर्गाच्या तिकिटाचे अवघे रुपये २१०० होतात.

या मार्गाने सर्व प्रकारचे लोक प्रवास करतात. माझ्या गाडीवर ४० अमेरिकन्स, १२ ब्रिटीश, काही कॅनॅडिअन्स, काही ऑस्ट्रेलियन्स, काही न्यूझिलंडर्स, डच आणि जर्मन लोक होते. त्यातील काही अर्धेमधे उतरले. बाकीचे सरळ मास्कोला गेले. अति पूर्वेकडे अभ्यासासाठी गेलेला एक तरुण घरी चालला होता. एक ऑस्ट्रेलियन वकील लंडनला चालला होता. डझन-भर नॉर्थ व्हिएतनामी वैमानिक मिग विमानं उडवणं शिकण्यासाठी रशियाला चालले होते.

तुमच्या कंपार्टमेंटमध्ये तुमचे सह-प्रवासी कोण असतात हा तुमच्या नशिबाचा भाग आहे. अतिपूर्वेकडे अभ्यास करणारा तरुण माझ्या वरच्या बर्थवर होता. आणखी दुसरे कोणकोण

यताहेत याची आम्ही वाट पहात होतो.

प्रथम आला तो २८ वर्षांचा रेड-आर्मी लेफ्टनंट. तो पियानो-वादकही होता. तो उत्साही आणि सुहास्य वदनी होता. गाणी म्हणायचा. इंग्रजी शब्दांचा उच्चार करण्याचा तो प्रयत्न करी व मग खळखळून हसे. एक-दोन रात्री एका बर्थवर एक नौसैनिक होता. तो कम्‌चटका येथील नौसैनिक होता. त्याच्याजवळ एक मोठी थैली होती. तिच्यात ताज़ी अंडी होती. मधून मधून तो दोन अंडी उचली व कच्चीच गिळून टाकी.

नंतर एक देखणी व चुणचुणीत अशी रशियन तरुणी आली. ती युनिव्ह-सिटीच्या एका परीक्षेसाठी चालली होती. माझ्या वरच्या बर्थवरील तरुणाचे डोळे तिला पहाताच चकाकले. काही मिनिटांच्या आतच ती दोघं शेजारी बसली व खी-खी करून हसू लागली. गप्पा करू लागली. एकमेकांच्या भाषेचे खून करू लागली. तो तिला कम्युनिस्ट म्हणून चिडवी तर ती त्याला भांडवल-दार म्हणे.

झोपायची तयारी करणं फारसं कठीण नव्हतं. आम्ही तीन पुरुष कॅरि-डॉरमध्ये गेलो व त्या तरुणीनं कपडे बदलले.

भाषा हा एक महत्त्वाचा प्रश्न होता. मी म्हणीचं पुस्तक बाहेर काढताच रशियन प्रवासी माझ्या मदतीला आले. त्यापैकी कुणी इंग्लीश बोले. डायनिंग कारमध्ये बोलणं सुरक्षितपणाचं वाटलं व त्याहीपेक्षा आपापल्या कंपार्टमेंट-मध्ये बोलणं जास्त मोकळेपणाचं होतं.

जून महिना होता व हवा फार सौम्य होती, त्यामुळं कुणीकुणी नुसता पायजमा घालूनच रहायचे. पायजमा घालून ते केवळ कंपार्टमेंटमध्येच रहा-यचे असं नव्हे तर कॉरीडॉरमध्येसुद्धा तसेच फिरायचे. क्वचित् प्रसंगी डाय-निंग कारमध्ये देखील तसेच जायचे. आणि रेल्वेस्टेशनवर उतरून पायजम्या मध्ये फेरफटका मारायचे. त्यात त्यांना कमीपणा वाटत नसे. आमच्या रेल्वे रस्त्यावर एकूण ६२ स्थानकं आहेत. मी मात्र वेड्यासारखे रेडफ्लॅनेल अंडर वेअर व फर लाइन्ड बूट घातले होते. हिवाळ्यामध्ये इथे भयंकर थंडी असते. शून्याखाली ६० अंश किंवा त्याहूनही जास्त थंडी इथं असते. अशा वेळी रेल्वेरस्ता साफ करण्यासाठी, त्यावरील बर्फ दूर करण्यासाठी मोठमोठी फावडी तयार ठेवावी लागतात.

सध्या रेल्वे हेच माझं घर आहे. बिचारा कोच-अटेंडंट झोपत पण नसावा. तो (किंवा ती) सतत काहीना काही काम करीत असत. कधी दिवा साफ कर, कार्पेट व्हॅक्यूमनं जमीन साफ कर, हे नीट कर, ते नीट कर, मला चहा आण असं काहींना काही काम, त्यांचं चालूच असतं. थोड्याच वेळात, ही आगगाडी म्हणजे आमचं चालतं घर आहे असं मला वाटू लागलं. आमच्या गाडीतील सह-प्रवासी पेय घेण्यासाठी कधी आमचेकडे तर कधी आम्ही त्यांच्याकडे जात-येत होतो. केव्हा केव्हा आम्ही डायनिंग कारमध्ये बसून गप्पा करीत असू.

ब्रेकफास्टसाठी रशियन पद्धती-प्रमाणे मी Caviare घेऊ लागलो. (त्याच्या मोठ्या तुकड्याला ३५ सेंटस् पडतात.) प्रत्येक स्टेशनवर उतरून काही बरंसं खायला मिळतं का हे आम्ही पहात असू. शेतकऱ्यांच्या बायका प्रत्येक स्टेशनवर काहीना काही विकावयास आणीत. तळलेले मासे, कांदे, लोणी, उकडलेले बटाटे असं काही तरी.

बारा कोच असलेली ही एक्सप्रेस आरामात चालली होती. प्रत्येक डब्यात भलं मोठं टाईमटेबल लावलं होतं व गाडी प्रत्येक स्टेशनला निश्चीत कोणत्या वेळी पोचणार ते दर्शविलेलं होतं. ते स्टेशन नक्की किती वाजता सोडणार हे दर्शविलेलं होतं. व हे टाईमटेबल काटेकोरपणे पाळलं जात होतं. (गोंधळ होऊ नये म्हणून सारी कामं मास्को टाईम प्रमाणे केली जातात.)

ही एक्सप्रेस दर ताशी ७५ मैलांच्या वेगानं धावू शकते. पण या मार्गावर कितीतरी गाड्या येत जात असतात — दर थोड्या मिनिटांनी कुठलीना कुठली गाडी येत असतेच. म्हणून हे ५७७७ मैलाचं अंतर ही एक्सप्रेस १५८ तास १२ मिनिटांमध्ये कापते. म्हणजे दर ताशी ३७ मैलांचा प्रवास होतो. यामध्ये गाडी थांबते तो वेळही अंतर्भूत आहे.

झारच्या कारकिर्दीत १८९१ ते १९०४ मध्ये ही रेल्वे बांधली गेली. एवढ्या मोठ्या लोहमार्गाची दुसऱ्या कोणत्याही देशाला आवश्यकता नव्हती. हिंदुस्थान आणि चीन एकत्र केले तर त्याहून सैबेरिया मोठा आहे.

ही रेल्वे होण्यापूर्वी व्लादिवो-स्टॉकच्या माणसाला सेंट पिटर्सबर्ग येथे जायचं असेल तर समुद्रमार्गे सॅन्फ्रान्सी-स्कोला जायचं, तिथून गाडीने न्यूयॉर्क व तिथून बोटीने अटलांटिकमार्गे बाल्टीक समुद्रात. या प्रवासाला तीन महिने लागत. आणि सैबेरियातून खुश्कीच्या मार्गे त्याने जायचं ठरविलं तर त्याला एक वर्ष लागत असे.

या लोहमार्गाला जेवढी संकटं आली तेवढी दुसऱ्या कोणत्याही लोहमार्गाला जगामध्ये आली नसतील. हा लोहमार्ग 'टायगा' म्हणून हिरव्या समुद्रावरून जातो. या प्रदेशाची रुंदी ३००० मैल आहे. यामध्ये दलदल, वाळू, घनदाट जंगल असं होतं.

यासाठी ४००० पेक्षा जास्त पूल बांधावे लागले. त्यापैकी एक पूल अमूर नदीवर खाब्रोव्हास्क येथे आहे. तो दीड मैल रुंदीचा आहे. सैबेरियात कडा-क्याची थंडी असते. तिथे वर्षातील फक्त १२० दिवस उघड्यावर काम करता येते. फावडी-टिकाव वगैरे मजुरांची उपकरणं दुसऱ्या दिवशी थिजलेल्या जमिनीतून उकरून काढावी लागतात; आणि जणू ती उपकरणं रबराची आहेत असं वाटतं.

एका लबाड कॉंट्रॅक्टरने रेल्वेचा एक बाजूचा मार्ग बर्फाच्या घट्ट उंचवट्यावर बांधला. उन्हाळा येईपर्यंत ते सारं फार छान दिसत होतं. पण उन्हाळा आला, बर्फ वितळू लागलं तेव्हा प्रचंड पूर आले आणि त्या पुरात शेकडो कामगार बुडून मेले, २३० मैलांची रेल्वेलाईन

वाहून गेली व १५ पुलांचा नाश झाला.

रशियाच्या रक्तमय क्रांतीमध्ये कम्युनिस्ट विजयी झाले व सत्तेवर आले. तरीही त्यांना या रेल्वेवर १९२० पर्यंत पूर्ण ताबा मिळाला नाही. त्यानंतर १९३० पर्यंत कम्युनिस्टांनी या रेल्वे-मार्गाकडे फारसं लक्ष दिलं नाही. त्यावेळी रशियाची सूत्रं स्टॅलिनच्या हातात होती. त्यानं हे काम पुरं करावयास घेतलं — भक्कम करावयास घेतलं. शेवटी हा सर्व लोहमार्ग दुहेरी करावयाचा त्याने हुकूम दिला व हे प्रचंड काम १९३९ मध्ये पूर्ण केलं.

रेल्वे पूर्ण झाली आणि तिने सैबेरियाचा कायाकल्प करावयास सुरुवात केली. रशियातील शेतकऱ्यांना सरकारनं सांगितलं की जे शेतकरी सैबेरियात जाऊन स्थायीक होतील त्यांना प्रत्येक कुटुंबाला १४० एकर जमीन मोफत मिळेल व त्यांना काही वर्षं सक्तीच्या लष्करी नोकरीमध्ये सूट मिळेल. त्यांना सैबेरियात जाण्यासाठी रेल्वे दर अत्यंत स्वस्त ठेवले होते. पाच माणसांचं कुटुंब २५०० मैलांचा प्रवास केवळ ११। रुपयात करू शकत होतं.

यामुळे सैबेरियाकडे माणसं जाऊ लागली. आजची सैबेरियाची लोकसंख्या अडीच कोटी आहे. त्यापैकी नऊदशांश युरोपियन स्लाव्हाक वंशाचे लोक असून एकदशांश तद्देशीय लोक आहेत.

दुसऱ्या महायुद्धामध्ये नाझींच्या तडाख्यातून आपले उद्योगधंदे वाचविण्यासाठी रशियाने आपले प्रचंड कारखाने उरल पर्वताच्या मागे नेले. हा रेल्वेमार्ग नसता तर हे काम केवळ अशक्य होतं. एक फॅक्टरी हलविण्यासाठी ८००० वॅगन्स लागल्या.

आज रशियन उद्योगधंद्यांचा मध्यबिंदू सैबेरियाकडे आहे. याचं सारं काम हीच रेल्वे करते. सैबेरिया अजूनही मागासलेला असला तरी तो रशियन साम्राज्याचा प्राण आहे.

ट्रान्स-सैबेरियन रस्ता ही एक रशियन मिलिटरीची डोकेदुखी आहे. कारण पॅसिफीकच्या पश्चिमेला आणि दक्षिणेला सत्तर कोटी चिन्यांपैकी काही आहेत व ते जमिनीचा इंच इंच भाग बळकावू पहाताहेत. त्यांच्या नजरेसमोर रशियन सैबेरियाचा प्रचंड प्रदेश होता. तो निर्मनुष्य होता व चिनी लोकांना रहायला जमीन हवी होती. त्या जमिनीपैकी काही जमीन रशियाने १८५० मध्ये चीनकडून बळकावली होती.

१९६७ मध्ये मावत्सेतुंग म्हणाला की, चीनला त्याची जमीन परत हवी आहे. या रेल्वेचा शेकडो मैलांचा मार्ग हा चीनच्या बंदुका आणि तोफा यांच्या आवाक्यामध्ये आहे. एखादा पूल उडवला, एखादा टनेल तोडला तरीही रेल्वे कित्येक आठवडे निरुपयोगी होईल आणि या रेल्वेशिवाय रशियाला इकडून तिकडे माल अगर माणसं न्यायला दुसरं कोणतंच साधन नाही. आर्टिक समुद्र हा कित्येक महिने गोठलेला आणि खुश्कीचा दुसरा मार्ग उपलब्ध नाही. रशियाची डोकेदुखी ती हीच.

आगगाडीने जाताना दिसणारा

सबेरिया हा तसा नयनरम्य नाही. शहराच्या बाहेर क्वचितच डांबरी रस्ते असतील. इमारती चांगल्या रंगविलेल्या नसत, कंपाऊंडस मोडकी तोडकी असत. मधूनच कुठेतरी फुले दिसत. बटाटयांची मैलच्या मैल शेतं, मोटार क्वचितच दिसे. बायसिकलही क्वचितच दिसे. माणसंसुद्धा फारच क्वचित दिसत. केव्हातरी नदीत पोहताना मुलं दिसत. बिकिनी घातलेली एखादी मुलगी दिसे. काही माणसं चहा करताना दिसत.

सैबेरिया श्रीमंत आहे असं जे सांगण्यात येतं तो केवळ प्रचार नव्हे, सत्य आहे. भूगर्भातील तेलाचे नवे साठे, हिऱ्यांच्या खाणी, सोन्याच्या खाणी, कोल आणि बॉक्साईटचे साठे तिथे प्रचंड आहेत. पूर्व सैबेरियामध्ये मिळणारा दगडी कोळसा हा सर्व पश्चिमी देशांच्या कोळशापेक्षा जास्त आहे.

तज्ज्ञांना कित्येक वर्षेपर्यंत वाटत होतं की, सैबेरियाच्या भूगर्भातील हे धन गोठलेल्या अवस्थेत असेल व त्यामुळे त्याचा काही उपयोग होणार नसेल. त्या साठयांचे दरवाजे उघडण्याचे काम शास्त्र करीत आहे. अगदी कडाक्याच्या थंडीतसुद्धा ही कामं चालू असतात. ऐकहल (AIKHAL) या अति उत्तरेकडील नव्या शहराची परिपूर्णता झाली आहे. हे संपूर्ण शहर बंदिस्त आहे. त्यावर एक प्रचंड आवरण आहे. थर्मामीटरमध्ये शून्याखाली ६०° उष्णता आली तरी या शहरातून तुम्ही शर्ट-पायजमा घालून हिंडू शकता. जवळच्या हिऱ्यांच्या खाणीत हिवाळयात व उन्हाळयात सतत काम चालू असतं.

किंवा नोव्होसिबिर्क्स शहराचं उदाहरण घ्या. उरल पर्वतांच्या पूर्वेला असलेलं हे सर्वांत मोठं शहर. हे शहर उदास वाटणारं आणि कुरूप आहे. इथं मैलच्या मैल कारखाने आणि दुकानं आहेत. वैमानिकांच्या खुणांच्या खांबांची जंगलं आहेत, मोठमोठ्या बराकी आहेत. त्या बराकीत कामगार रहातात. हे सारं असं असलं तरी इथे प्रचंड उत्पादन होते. सर्व प्रकारची उपकरणे होतात, त्या उपकरणाचे ढीगच्या ढीग पडतात. लोकांच्या नित्योपयोगाचा माल, टर्बाइन्स, निरनिराळी उपकरणं वगैरे.

तशीच दहा-बारा छोटी छोटी उदयोन्मुख शहरं आहेत. त्यापैकी काही शहरांच्या जागी दहा वर्षांपूर्वी नुसती जंगलं होती. अशा शहरांपैकी एक अकाडेमोगोरोडाक. (AKADE MOGORODOK), इथं जवळजवळ तीस हजार शास्त्रज्ञ, इंजिनिअर्स आणि तंत्रज्ञ रहातात. ज्ञानाचा हा प्रचंड साठा, एकत्र ठेवून त्यांच्याकडून सुसंघटीतरीत्या काम करून घेतलं जातं. सैबेरियाचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल, हे ते काम.

इरकुटस्ककडून एक तास प्रवास केल्यावर बैकल-तलाव लागतो. (बैकल याचा अर्थ समृद्ध तलाव.) तो ३९५ मैल लांब असून एक मैलापेक्षा जास्त खोल आहे. त्यामध्ये असलेले प्राणी आणि वनस्पती यांची संख्या १८०० पेक्षा जास्त आहे आणि त्या १८००

पैकी १००० प्राणी व वनस्पती जगात इतरत्र कुठेही नाहीत.

या तलावाच्या काठाने तेल आणि सोन्याच्या खाणी आहेत आणि याचं पाणी इतकं शुद्ध आहे की, ते सरळ बॅटरीमध्ये ओतलं तरी चालेल. मात्र याची खरी किंमत बैकलचं पाणी हे नसून त्याचा प्रचंड साठा हे आहे. हे तळं म्हणजे जगातील सर्वांत मोठं एकटं हायड्रो-इलेक्ट्रीक पॉवर आहे. त्याला पुष्कळशी धरणं बांधली जाताहेत.

बैकलच्या पश्चिमेला गाडी सैबेरियाच्या विस्तीर्ण माळरानात शिरते. हे माळरान जगातील सर्वांत मोठं पठार आहे. पश्चिम युरोपएवढं हे मोठं असून संपूर्णपणे सपाट आहे. इथं पुष्कळ शहरं आहेत. लोक आहेत आणि आपण आता युरोपच्या जवळ आलो ही भावना तुम्हाला होऊ लागते. मग उरल पर्वत लागतो. युरोप आणि आशिया यांच्यामधली ही सरहद्द. रेल्वे किलोमीटर ९०००–८०००–७००० असं दर्शविणारे बोर्ड दिसू लागले. जेव्हा १७७८ चा बोर्ड दिसला तेव्हा आपले सामान गुंडाळावं असं मला वाटलं.

आमची गाडी मास्को स्टेशनवर ठरलेल्या वेळी आली. आम्ही आमच्या घड्याळात पाहिलं. ही गाडी जवळ जवळ आठवडाभर पश्चिमेकडे धावते आहे. पृथ्वीच्या एक चतुर्थांश भागाचं भ्रमण तिनं केलं, पण माझ्या सोबत्यानं घड्याळात पाहून नाक मुरडलं. आज ट्रान्स-सैबेरियन रेल्वे उशीरा आली. तो म्हणाला. किती उशीरा तर नव्वद सेकंद !

● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# लोकहितवादी

## पुस्तके

एकोणिसावे शतक हे सर्व दृष्टींनी क्रांतिकारक ठरलेले शतक आहे. या शतकात घडलेल्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक चळवळींमुळे भारताचे चित्र आमूलाग्र बदलले. इंग्रजांच्या संस्कृतीशी संबंध आल्याने मध्ययुगीन भारताने आधुनिक युगात पदार्पण केले. महाराष्ट्रातही याच काळात प्रबोधनाचा उषःकाल झाला. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी इत्यादी विचारवंत हे महाराष्ट्रातील प्रबोधनाचे आद्य शिल्पकार, परंतु त्यापैकी लोकहितवादी-विषयींच्या अपसमजामुळे त्यांना योग्य ते स्थान मिळाले नाही. महाराष्ट्राने अगदी अलीकडील काळापर्यंत त्यांची उपेक्षाच केली. लोकहितवादी त्यांच्या लेखनावरून ज्ञात होण्याऐवजी त्यांच्या विरोधकांकडून व टीकाकारांकडून ओळखले जाऊ लागले.

अलीकडील काळात लोकहितवादींची विचारधारा समजावून घेण्याचे व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून त्यांना न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू झालेले आहेत. आतापर्यंत झालेल्या प्रयत्नात लोकहितवादींच्या विचारांचे परिशीलन करताना काहींनी त्यांच्या शतपत्रांचा आधार घेतला, तर इतरांनी लोकहितवादींचे विविध विचार सूत्ररूपाने मांडले. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी मात्र लोकहितवादींच्या समग्र ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास केला व 'लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व' हा आपला ग्रंथ सभ्यासकाना सादर केला. त्यात लोकहितवादींच्या सर्वांगिण विचारांचे दर्शन आपल्या प्रभावी भाषेत त्यांनी घडवले आहे.

इंग्रजांचे आक्रमण यशस्वी झाले नसते तर भारतीय समाजात प्रबोधनाची पहाट उगवली असती काय? असा महत्त्वपूर्ण प्रश्न विचारून त्याचे उत्तर शोधण्याच्या दृष्टीने लेखकाने ब्रिटिशपूर्व काळातील समाजरचनेवर प्रकाशझोत टाकला आहे आणि इंग्रज चांगला व न्यायी असे लोकास वाटू लागले व त्यांचे राज्यनिर्मितीस साह्य मिळाले हा लोकहितवादींच निष्कर्ष किती योग्य होता हे दाखवून दिले आहे.

लोकहितवादी हे मूलगामी समाजहितचिंतक होते. त्यांच्या समाजचिंतनाचे विवेचन करताना लेखक म्हणतात की,

मराठी साहित्यात लोकहितवादींच्या रूपाने नवविचारांची एक प्रचंड लाट उचंबळून आली व तिचे स्वरूप बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग यांच्या लेखनापेक्षा अधिक आवेगपूर्ण आहे. समाजविचार सर्वंकष दृष्टीने करून त्याची सुसंबद्ध मांडणी मराठी साहित्यात विलक्षण धिटाईने सर्वप्रथम लोकहितवादींनी केली. ग्रंथप्रामाण्याला त्यांनी कडवा विरोध केला, तथापी सुधारणा व्हावी म्हणून धर्मग्रंथाचा आधार घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. हिंदु समाजाच्या अधःपतनाची चिकित्सा केली व नेमक्या सडलेल्या भागावर बोट ठेवले. जातीय विषमतेवर वैचारिक प्रहार करणारा हा पहिला समाजचिंतक होता. मराठी निबंधात या प्रकारचे विचार सतत आग्रहपूर्वक मांडून मराठी निबंध त्यांनी समाजरचनेच्या कार्यातील साधनरूप बनविला ही त्यांची उल्लेखनीय कामगिरी आहे. लेखक पुढे म्हणतात की, बुद्धिरेव बलीयसी असा जरी त्यांचा बाणा असला तरी शास्त्रवचनांची साक्ष काढणे त्यांना आवश्यक वाटले. येथे लेखकाने शास्त्रवचनांची साक्ष काढणाऱ्या लोकहितवादींचे समर्थन केले असले तरी प्रत्यक्षात त्यावरून लोकहितवादींच्या मर्यादाच स्पष्ट झालेल्या आहेत. अर्थात या केवळ त्यांच्या मर्यादा नसून एकोणिसाव्या शतकातील समग्र बुद्धिवाद्यांच्या मर्यादा आहेत हे मान्य करावे लागते.

## आधारभूत साहित्याचा मागोवा

लोकहितवादींनी अंतर्मुख होऊन हिंदुसमाजाच्या धार्मिक अधिष्ठानाचा अभ्यास केला. धर्म आणि बुद्धिवाद यांचे नाते जोडले. धर्मविचार ऐहिक अभ्युदयांशी संलग्न करण्याचे महनीय कार्य बंडखोरपणे केले हे लेखकाने लोकहितवादींच्या स्वाध्याय, आश्वलायन गृह्यसूत्र, आगमप्रकाश, गीतातत्त्व इत्यादी ग्रंथावरून मार्मिकपणे दाखवले आहे. समाजाची घडण सुयोग्य व बलिष्ठ पायावर व्हावी व त्यासाठी समाजाचे विचार व आचार सुसंगत व सुदृढ असणे अगत्याचे असल्याचे लोकहितवादींना तीव्रतेने वाटत होते असेही मत लेखकाने प्रदर्शित केले आहे. अर्थात या संदर्भात लोकहितवादींच्या आचार–विचारातील विसंगती दृष्टिआड करणे कठीण आहे, व त्यामुळे लोकहितवादींच्या विरोधकांना त्यांच्या कार्यावर शितोडे उडविण्याची संधी प्राप्त झाली हे मात्र नाकारता येत नाही.

इतिहास हा लोकहितवादींच्या लेखनाचा आधार. एकोणिसाव्या शतकात मराठीत वैपुल्याने इतिहासलेखन करणारा लोकहितवादी हा पहिलाच लेखक आहे असे विधान करता येईल असे डॉ. फडकुले म्हणतात. लोकहितवादींचे इतिहासविषयक विचार, इतिहासलेखनाचे स्वरूप व उद्दिष्ट यांचा आढावा घेताना लेखकाने लोकहितवादींच्या दुर्मिळ इतिहासविषयक साहित्याचा परामर्श घेतला आहे.

लोकहितवादींनी समाजाच्या राजकीय व आर्थिक अंगानाही स्पर्श केला आहे. लोकहितवादींच्या राजकीय व आर्थिक विचारसरणीचे परिशीलन करताना लेखक यथार्थतेने म्हणतात : 'खरे तर 'शतपत्रा'तून महाराष्ट्राच्या राजकीय जागृतीचा प्रथम प्रभावी आविष्कार होऊ लागला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.' लोकहितवादींचे राजकीय विचारदर्शन घडवून लेखकाने समर्थपणे पटवून दिले आहे की 'पाश्चिमात्य प्रभावाखाली स्वत्व विसरलेला एक लेखक' अशा अभिप्रायाची लोकहितवादींवरील टीका निराधार व अन्यायकारक आहे. लोकहितवादींच्या विचारातील दृष्टेपणा पूर्णपणे निदर्शनास येऊ लागला आहे. संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करणारे, इहवादी व शास्त्रीय दृष्टिकोनातून अनेक समस्यांची चिकित्सा करणारे लोकहितवादी, इंग्रजी राज्याच्या मागे ईश्वरी सूत्र असल्याचे प्रतिपादन करतात. या मागील लोकहितवादींची भूमिका नीटशी स्पष्ट झालेली नाही. तसेच त्यांच्या राजकीय विचारदर्शनात स्थानिक स्वराज्यसंस्था, क्रांतीची मीमांसा व लोकशाही जीवनमार्ग व्हावा म्हणून त्यांना अभिप्रेत असलेले विचार यांचाही समावेश करावा लागेल. 'आधी सामाजिक की आधी राजकीय' या ऐतिहासिक वादात लोकहितवादींच्या विचारांचे महत्त्व ग्रंथकाराने आधुनिक काळाच्या संदर्भात स्पष्ट केले असते तर त्यांचे विचार किती प्रगल्भ आणि दूरदर्शीपणाचे होते हे वाचकाच्या चटकन लक्षात आले असते.

### समतोल मूल्यमापन

लोकहितवादींचे आर्थिक विचारमंथन करताना स्वदेशीचा पुरस्कार करून लोकमान्य टिळक व महात्मा गांधी इत्यादी नेत्यांनी लोकहितवादींचे १८४८ मधील विचार कसे आत्मसात केले हे लेखकाने दाखवून दिले आहे.

पारतंत्र्याचे पहिले पुरस्कर्ते म्हणून लोकहितवादींवर केली जाणारी टीका किती विपर्यस्त आहे हे लेखकाने अत्यंत मार्मिक व निःसंदिग्ध शब्दांत दर्शवले आहे. लोकहितवादींची म. फुले, आगरकर, न्या. मू. रानडे इत्यादींच्या विचारांशी केलेली तुलना त्यांच्या व्यक्तित्त्वाला विशेष उठाव आणून देते.

डॉ. फडकुले लोकहितवादींना, 'आधुनिक मराठीचा पहिला शैलीकार' म्हणतात. लोकहितवादींनी भाषामाध्यमाचा प्रश्नही हाताळला होता. याचे श्रेयही लोकहितवादींना मिळावयास हवे.

पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

ग्रंथाच्या परिशिष्टात लोकहित-वादींनी Legislative Council of the Governor of Bombay येथे केलेल्या भाषणांचा निवडक भाग प्रसिद्ध केला आहे व अशा रीतीने त्यांचे दुर्मिळ साहित्य वाचकास उपलब्ध करून दिले आहे.

एखाद्या व्यक्तीवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करावयाचे म्हणजे विचारांत अभिनिवेश येणे स्वाभाविक असते.

डॉ. फडकुल्यांनी मात्र हा मोह बऱ्याच अंशी टाळला आहे, म्हणूनच त्यांचे समग्र विवेचन अतिशय उत्कट असूनही समतोल व तर्कसुसंगत झालेले आहे.

लोकहितवादींचे वाङ्मय दुर्मिळ आहे, तरीही त्यांच्या वाङ्मयाचा विवेचक अभ्यास करून लोकहित-वादींच्या कार्याचे महत्त्व लेखकाने आपल्या प्रभावी शैलीने विशद केले आहे. त्यामुळे लोकहितवादींसंबंधीच्या अपसमजुतींचे निराकरणास मदत होईल. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या अभ्यास-काला हा ग्रंथ अत्यंत मोलाचा ठरेल यात शंका नाही.

**—डॉ. वसंत क्षीरे**

**लोकहितवादी : काल आणि कर्तृत्त्व**
डॉ. निर्मलकुमार फडकुले
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०.
किमत वीस रुपये.


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

**किमत : सात रुपये**

**राजहंस प्रकाशन**

# विदर्भात : साहित्य संमेलनासाठी

द. मा. मिरासदार

यवतमाळच्या साहित्य संमेलनाला खाजगी गाडी घेऊन जायचे ठरले तेव्हा मी निनकामा काही खूश नव्हतो. पुणे ते यवतमाळ अंतर चारशे मैला-पेक्षाही अधिक. गाडी कितीही चांगली असली तरी सारखे बसून रहावे लागणार. अंग अगदी आंबून जाणार. त्यापेक्षा रेल्वेने गेलो तर रात्रभर छान झोप होईल. ताज्यातवान्या शरिराने आपण यवतमाळला दाखल होऊ. पण माझे हे म्हणणे मित्रांनी मनावर घेतले नाही. जाताना ठीक आहे, पण परत येताना रिझर्व्हेशन मिळणे अशक्य. मग रडतखडत परत यावे लागेल. त्यापेक्षा थोडा त्रास वाटला तरी हरकत नाही पण स्वतःचे वाहन बरोबर नेणे चांगले, हा त्यांचा सूर होता. थोडा विचार केल्यावर मलाही त्यात तथ्य वाटले. अध्यक्ष श्री. ग. दि. माडगूळकर हे स्वतंत्र गाडीकरूनच निघणार होते. आपणही त्यांच्याबरोबरच निघावे. वाटेत रात्री औरंगाबादला मुक्काम करावा. पुनः सकाळी लवकर निघून दुपारी जेवणाच्या वेळेपर्यंत पुसदला पोचावे पुसदला रात्री मुक्काम करून संमेलनाच्या दिवशी यवतमाळला दाखल व्हावे असे ठरले. संध्याकाळी पाचच्या सुमाराम निघायचे ठरले. पण पाचचे आठ साडेआठ झाले. त्यामुळे पुढचा सगळाच कार्यक्रम विस्कटला. अपरात्री दोनअडीचला औरंगाबादला पोचलो. थोडीशी झोप काढून आणि सकाळचे सगळे कार्यक्रम उरकून आठनऊ वाजता पुसदची वाट पुसतपुसत निघालो.

¤

औरंगाबादहून जालना, देऊळगाव, राजा, चिखली, मेहेकर, कारंजा, वाशीम असा काहीसा तो मार्ग होता. रस्ते उत्तम होते. हवा प्रसन्न होती. मुख्य म्हणजे सगळ्या रस्त्यावर सुखद शांतता होती. पुणे-कोल्हापूर–किंवा पुणे-नासीक वाटेत गाड्यांचा जो कोलाहल वाटतो, तो या वाटेवर मुळीच नव्हता. मैलन् मैल वाहन भेटत नव्हते. एखादा मालट्रक धूळ उडवून निघून जाई तेवढाच. एस्. टी. ची बस समोरून येताना केव्हातरी दिसे. आणि आडरानात कोणीतरी ओळखीचे भेटले म्हणजे जसा आनंद होतो, तसा होई. बैलगाड्या खुशाल रस्त्याच्या मधून शांतपणे

चाललेल्या आढळत. बायाबापड्या, पोरेढोरेही रमतगमत डांबरी रस्त्याच्या मधून निवांत चाललेले दिसत. गाडीचे शिंग वाजल्यावर सर्वांची एकदम पळापळ होई. माणसे दचकल्यासारखी वागत. या वाटांना वर्दळीची सवयच नाही हे आमच्या लक्षात आले. त्या शांत जीवनाचा मनातून हेवा वाटला.

विदर्भाचा हा प्रदेश आमची कल्पना होती तसा वैराण मुळीच नव्हता. चांगला हिरवागार होता. जसजसे आत जावे तसतसा हा हिरवेगारपणा अधिक गहिरा होत होता. झाडाझुडपांचे सैन्य तर वाढत होतेच, पण यंदाच्या पावसाने बहरलेली दोन्ही बाजूची शेते डोळ्यांना अभिराम देत होती. संकरित ज्वारी, संकरित बाजरी यांचे गच्च पीक रानात डोलत होते, सूर्यफुलांची उदंड वस्ती दिसत होती. शेतीनिष्ठ मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात आपण प्रवेश केल्याचे जाणवत होते. पुसदच्या जवळ आल्यावर तर अरण्यवृक्षांनी वेढलेले सुंदर घाटच सुरू झाले. जिकडे पहावे तिकडे हिरव्यागार जाड पानांचे साग दाटीदाटी करून उभे होते. दूरवर निळेसावळे डोंगर आणि त्यामधले प्रचंड खोरे दिसत होते. एका वळणावर पाटी दिसली—'वसंतसागर.' आम्ही त्याहाळून पाहिले. लांबवर पाण्याचा एक मोठा साठा दुपारच्या रणरणत्या उन्हात झळाळत होता. बहुधा तो मोठा तलाव असावा. काय नेमके होते समजले नाही.

घाट संपत आले तसतशा वाटेत कमानी उभ्या केलेल्या दिसल्या. कोठे 'वेल्कम' होते, तर कोठे 'सुस्वागतम्.' आमच्या दोन्ही गाड्या येताना दिसल्या की कमानीजवळच्या माणसांची धावपळ सुरू होई. लांबवर असलेली पोरे, गडीमाणसे कमानीच्या दिशेने जीव घेऊन धावत. मला आश्चर्य वाटले. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे इथपासून स्वागत ?...मग लक्षात आले, अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण आणि मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक हे आत्ताच पुसदला येणार आहेत, अजून ते आले नसावेत. त्यांच्या स्वागताची ही तयारी. वाटेत 'मारवाडी' नावाचे छोटे गाव लागले. तेथे अशीच कमान होती. पोरांचा घोळका, गावातली काही माणसे आणि दोन पोलीस. गाडी थांबवून चौकशी केल्यावर एक हवालदारसाहेब म्हणाले, 'मिनिस्टरसाहेब अजून यायचे आहेत अकोल्याहून. त्यांच्या व्यवस्थेसाठीच आम्ही उभे आहोत. आत्ता थोड्या वेळात येतीलच.'

□

दुपारी तीन साडेतीनला पुसदच्या सर्किट हाऊसमध्ये दाखल झालो. तेथे सरकारी अधिकाऱ्यांची ही गर्दी उसळली होती. अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्र्यांचा सत्कार होता. बहुधा षष्ठ्यब्धपूर्तीनिमित्त असावा. संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. दि. माडगूळकर यांनी यवतमाळला जाता जाता या निमित्ताने पुसदला थोडा वेळ थांबावे, अशी पुसदकरांची इच्छा होती. म्हणून ते आले होते आणि 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' या न्यायाने आम्हीही त्यांच्या-

बरोबर पुसदला आलो होतो. दिवसभराच्या प्रवासाने सगळे शरीर आंबून गेले होते. भलताच थकवा आला होता. कोठेतरी आडवे व्हावे आणि चार-दोन तास ताणून द्यावी असे वाटत होते, पण त्या आवारात सरकारी मंडळींची एवढी गर्दी होती की, या गोष्टीला कोठे वावच नव्हता. संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. सुधाकर नाईक यांनी संमेलनाच्या वतीने पहिला हार माडगूळकरांना तेथेच घातला. 'पाहुणे यायला अजून वेळ आहे. तेव्हा थोडा वेळ घरी चला. चहा घेऊन परत येऊ-' ते म्हणाले. आम्हालाही दुसरा उद्योग काही नव्हताच. मुख्यमंत्र्यांचे घर तर पाहून येऊ, या विचाराने आम्ही उठलो आणि निघालो.

गावापासून जवळच नाईक कुटुंबाचा हा बंगला आहे. अत्याधुनिक सर्व गोष्टी तेथे होत्या. आम्ही प्रशस्त स्वागत दालनात बसलो होतो (आणि बंगल्याचा तेवढाच भाग त्यावेळी पाहिला.) संगमरवरी लादी. भिंतीवर मृगयेत मारलेल्या प्राण्यांची पेंढा भरून ठेवलेली शरीरे किंवा कातडी. माझ्या पाठीमागे बाजूला एक काळेभोर अस्वल नेहमी उभे राहते तसेच उभे करून ठेवले होते. (नंतर मुख्यमंत्र्यांशी घटकाभर झालेल्या गप्पागोष्टीत मात्र विचारता येण्यासारखा तेवढाच प्रश्न होता. 'हे अस्वल खरंच मारलेलं आहे काय ?–मी विचारले मुख्यमंत्री मिस्कीलपणे हसत म्हणाले, 'तर ! खरोखर मारलेलंच आहे !' ' त्यांच्या शिकारीच्या संदर्भात मी 'ताडोबाचे जंगल' ' हा शब्दप्रयोग पूर्वी ऐकला होता. म्हणून मी सहज पुढे विचारले–कुठं ? ताडोबाच्या जंगलात काय ?' सुदैवाने या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळाले आणि मी सुटकेचा निश्वास टाकला. आपल्याला यातलं अगदीच काही कळत नाही असे वाटणे बरे नव्हे) काही उत्तम चित्रे होती. रसिक माणसाने पहावे असे आणखीही तेथे काही असावे. पण चहा, गप्पागोष्टी यांच्या नादात हे सर्व पाहण्याइतकी सवड आम्हाला मिळाली नाही. पाहुणे येण्याची वेळ झाली आणि आमच्या गाड्या पुन: सर्किट हाऊसवर येऊन दाखल झाल्या. मानवंदना देण्यासाठी शिपायांची तुकडी सज्ज होती. त्यांचे वृंदवादकही खडे होते. दुपारपासून बिचाऱ्यांची घाई चालू होती. खडूच्या रेघा मारून, पुन: पुन: त्यांचा सराव चाललेला होता. आवार माणसांनी आणि पुढाऱ्यांनी शिगोशीग भरले होते, एकाएकी सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला आणि सर्वत्र सावधानतेचे वातावरण निर्माण झाले. भराभर गाड्या दाखल झाल्या. श्री. चव्हाण आणि श्री. नाईक गाडीतून उतरले. श्री. नाईक हे आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे पाईप तोंडात खुपसून शांतपणे बाजूला उभे होते. चव्हाणांच्या भोवती हारकरी मंडळींचा गराडा पडला होता. हार पुढे झाला की तो भर्रदिशी आपल्या हातात घेऊन चव्हाण त्या मंडळीना तोंड देताना दिसले. तेवढ्या गर्दीत ग. दि. माडगूळकरांना ओळखून त्यांनी माडगूळकरांना

अगदी उराउरी आलिंगन दिले. त्याची गंमत वाटली.) चव्हाणांचा पोषाख या वेळी वेगळाच वाटला. धोतर आणि रेशमाचा झुळझुळीत पिवळा नेहरू शर्ट. डोक्याला नेहमीप्रमाणे विशिष्ट कोन असलेली पांढरी टोपी. पोलिसांची मानवंदना त्यांनी अगदी सराईतपणे घेतली. मग विश्रांतीसाठी सर्व मंडळी सर्किट हाऊसच्या नव्याकोर इमारतीत रवाना झाली. त्यांच्या पाठोपाठ दर्शनोत्सुकांची भली मोठी गर्दीही आत घुसली.

मी, व्यंकटेश, पाटील बाहेर गप्पा मारीत बसून होतो. 'तुम्हालाही आत बोलावले आहे' असा सुधाकररावांचा निरोप आला तेव्हा आत जावेच लागले. यशवंतरावांच्या प्रशस्त दालनात ठळक मंडळी बसली होती. गप्पा चालल्या होत्या. मोठ्या माणसांच्या इतक्या जवळ बसून गप्पागोष्टी करण्याचा मला फारसा अनुभव नाही. त्यामुळे मी संकोचून बसलो होतो. भोवताली दहा-वीस मंडळींचा गराडा. काही बाजूला खुर्च्यांत बसलेले तर काही लांब उभे (त्यांच्यापैकी काही सुरक्षा-अधिकारी असावेत) या गराड्यात शांतपणे बोलत बसण्याची त्या उभयतांनाही सवय असावी. आम्हाला मात्र सगळे नवे आणि काहीसे विचित्र वाटत होते. या मंडळींना खाजगी आयुष्य हा प्रकार जवळजवळ नसावाच. घरच्या माणसाशी घटकाभर फुरसतीच्या गोष्टी बोलत असतानाही बाहेरची माणसे सतत आत डोकावत असतील, असे माझ्या मनात येऊन गेले. आमचे काही बोलणे चालले आहे एवढ्यात चारदोन मंडळी दरवाजातून पुढे घुसली. त्यांनी तेवढ्यात चव्हाणांच्याजवळ जाऊन कसलेतरी गाऱ्हाणे सांगितले. एक अर्जही त्यांच्या हातात ठेवला. अशा स्थितीत तुटकतुटक गप्पा चालल्या होत्या, इतकेच.

चव्हाण स्नानासाठी उठले तसे आम्हीही उठलो. पण वसंतराव म्हणाले, 'चला माझ्या खोलीत बसा.' या इथल्या गर्दीत आमची बसण्याची व्यवस्थासुद्धा नीट नसणार हे नाईकांच्या लक्षात आले असावे. म्हणूनच त्यांनी आग्रह करून आम्हा सर्वांना आपल्याबरोबर नेले. त्यांच्या खोलीतही अशाच गप्पागोष्टी आणि अशीच मध्ये मध्ये घुसणारी जनता. आम्ही बसून पाच मिनिट होत आहेत न होत आहेत तेवढ्यात वीसपंचवीस कार्यकर्ते मंडळी घोळक्याने आत घुसली आणि आमच्या खुर्च्यांच्या मागे अगदी लायनीत उभी राहिली. वसंतरावांनी शांतपणे त्यांच्याकडे एकदा पाहिले. पाईप बाजूला घेतला. एक-दोन मंडळीशी ते सलगीने मिनिटभर बोलले. मग त्यांनी आपल्या पुतण्याला हाक मारली, 'अरे सुधा, ही मंडळी आलीत. त्यांना चहा वगैरे द्या तिकडे. सुधाकररावांनी चला म्हटल्यावर सगळ्यांची पांगापांग झाली. मला नाईकांच्या चातुर्याचे कौतुक वाटले. एखादी गोष्ट नेहमीचीच झाली म्हणजे माणसांनी त्यातून मार्ग काढावाच लागतो. दुसरे काय करणार? संमेलनासाठी येणाऱ्यांच्या रेल्वेच्या

अडचणी आम्ही सहज बोललो तेव्हा ते म्हणाले, 'अरे! हे मला कुणीच कसं बोललं नाही? मुंबईत कुणी मला सांगितलं असतं तर मुंबई ते धामणगाव एक खास डबा जोडून द्यायची व्यवस्था केली असती. म्हणजे कुणालाच तकलीफ झाली नसती.'

थोडचा वेळाने सर्व मंडळी मुख्य सभेसाठी रवाना झाली. आम्ही थकले-भागलेले होतो. सर्किट हाऊसवर शुक-शुकाट झाल्यावर थोडा वेळ गप्पा-गोष्टीत घालवून जी ताणून दिली ती रात्री जेवायला बोलावणे येईपर्यंत.

रात्री मुख्यमंत्र्यांच्या घरच्या जेवणाचा आस्वाद घेतला. तिथं मात्र थोडा वेळ का होईना पण शांतपणाने छान गप्पा रंगल्या बडी मंडळी रात्रीच यवतमाळला जाणार होती. नाईक मात्र म्हणाले, 'तुम्ही दिवसभराच्या प्रवासानं थकला असाल. आज इथच मुक्काम करा अन् उद्या सकाळी यवतमाळला या.'

त्यांनी सांगितले तसे केले. भरपूर झोप काढली. सकाळचे प्रातर्विधी उरकून पोटभर न्याहरी केली आणि यवतमाळला निघालो. दुपारी बारा वाजता बरोबर जेवणवेळेला यवत-माळला येऊन दाखल झालो.

¤

साहित्य संमेलनाचा मुख्य सोहळा दुपारी चार वाजता सुरू झाला आणि अध्यक्षांचे भाषण होऊन सात वाजता संपले मुद्दा. मी आजपर्यंत दहापाच तरी संमेलने पाहिली आहेत. इतर संस्थांचीही पाहिली आहेत. पहिल्या प्रास्ताविकातच इतका वेळ जातो आणि तोपर्यंत इतक्या वक्त्यांनी आपला जीव खाल्लेला असतो की, अध्यक्षांचे भाषण सुरू होण्याच्या सुमारास आपण पुरेपूर हैराण झालेलो असतो. हे आता संपेल कधी याचीच फक्त वाट पाहत असतो. थोडक्यात म्हणजे अध्यक्षांचे भाषण पडेल कसे याची सर्व व्यवस्था झालेली असते. सुदैवाने यवतमाळला तसे घडले नाही. संयोजक मोठे चतुर दिसले. पूर्वी प्रत्येक विभागातून अध्यक्षांच्या नावाला पाठिंबा देणारी भाषणे व्हायची. या वेळी महामंडळाचे अध्यक्ष श्री. वा. ल. कुलकर्णी यांनी अवघ्या पाच मिनिटात संमेलनाचा इतिहास सांगितला. माडगुळकरांचा 'कृति कवी' म्हणून गौरव केला आणि अध्यक्षांचे अधिकार त्यांच्या हाती सोपवून आपले भाषण संपवले.

संमेलन गावाबाहेरच्या एका शाळेच्या आवारात भरले होते. फार मोठा मांडव टाकला होता. आठदहा हजार माणसे बसतील एवढा. आणि या मुख्य सोहळ्याला तो काठोकाठ भरला होता. व्यासपीठावर सगळी बडी मंडळी बसली होती. त्यात संमेलनाचे माजी अध्यक्ष होते. निमंत्रित पाहुणे आणि साहित्यिक होते. इतरही काही कार्यकर्ते होते, काही अनावश्यक मंड-ळीही कदाचित असावीत. (सभेतल्या गर्दीपैकी शक्य तितका भाग व्यासपीठा-वरच सामावून घेण्याची समाजवादी चालरीत अनेक ठिकाणी दिसते. विशे-

षतः काँग्रेस पक्षाचे व्यासपीठ याबद्दल प्रसिद्ध आहे. प्रत्येक पांढऱ्या टोपीची त्याठिकाणी बसण्याची धडपड चाललेली असते. बरे, ही टोपी नुसती तिथं जाऊन बसत नाही तर दुसऱ्या टोपीला खुणावत असते आणि 'आहे इकडे जागा आहे–' म्हणून बोलावीत असते. व्यासपीठाचा प्रत्येक चौरस सेंटीमीटर उपयोगात आणला जावा ही त्यांची धडपड कौतुक करण्यासारखी असते हे खरेच ! ) पण आटोपशीर कार्यक्रमामुळे ही गर्दी त्रासदायक वाटली नाही. या आटोपशीरपणात सगळ्यात मार्क दिले पाहिजेत मजूर मंत्री श्री. नरेंद्र तिडके यांना, त्यांच्याकडे काम होते संमेलनाच्या निमित्ताने तयार केलेल्या स्मरणिकेच्या प्रकाशनाचे, अशा वेळी एक दहा पंधरा मिनिटाचे भाषण तरी नक्कीच. पण तिडक्यांनी ते टाळले. मंत्रीपदाला न शोभणारी गोष्ट केली. 'या स्मरणिकेचं मी प्रकाशन करतो–' एवढे एकच वाक्य बोलून त्यांनी आपला कार्यभाग संपवून टाकला. माझा तिडके यांच्याबद्दलचा आदर एकदम वाढला.

संमेलनाच्या निमित्ताने भरलेल्या ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन श्री. वसंतराव नाईक यांनी केले आणि संमेलनाचे उद्‌घाटन श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केले. दोघांनीही सुटसुटीत भाषणे केली. का कोण जाणे, पण यावेळी चव्हाणांचे भाषण फारसे रंगले नाही. त्या मानाने नाईकांचे भाषणच खुसखुशीत वाटले. चव्हाणांचे प्रकृतीस्वास्थ्य सध्या चांगले नाही. काहीना काही दुखणे सतत पाठीमागे लागले आहे, असा कुणीतरी खुलासा केला. तसेही असेल पण त्यांचे भाषण 'जमले नाही ' एवढे खरे, साहित्यिकांना काही सांगण्याचा माझा अधिकार नाही असे म्हणत म्हणत नाईकांनी मात्र चार गोष्टी सांगितल्याच. 'आता यापुढं दोन तीन दिवस तुम्ही आम्हाला सल्ला देणारच आहात–सरकारनं काय करावं काय करू नये–तेव्हा त्याआधी मीही तुम्हाला थोडासा सल्ला देतो. म्हणजे फिटंफाट झाल्यासारखी होईल–' असे बोलून त्यांनी हशा पिकवला. नाईकांच्यात वक्तृत्वाचे गुण फारसे नाहीत. थोडेसे थबकत थबकतच ते बोलतात. पण निरनिराळ्या तऱ्हेनी बोलणे खुमासदार कसे करावे आणि प्रसंग कसा निभावून न्यावा, याचे त्यांना चांगले ज्ञान आहे.

ग. दि. माडगूळकरांचे अध्यक्षीय भाषण सुमारे तासभर तरी झाले असावे. आम्ही मंडळी त्यांना आग्रह करीत होतो की, तुम्ही छापील भाषण शक्यतो वाचू नका म्हणून. त्यातील मुद्दे घेऊन प्रत्यक्ष बोला ते चांगले होईल. पण ऐन वेळी त्यांनी भाषण वाचायचे ठरवले आणि वाचूनच दाखवले. (मधेमधे दोन-तीन ठिकाणी मात्र ते थोडेसे थांबून खुलासेवजा स्वतंत्रपणे बोलले.) भाषणाचे वाचन ही गोष्ट कितीही केले तरी निर्जीव होते. श्रोत्यांशी संवाद पुरा साधला जात नाही. श्रोत्यांकडे बघत बघत त्यांचा अंदाज घेत मजेने बोलत राहण्यात जे काही सुख असते ते वेगळेच.

विहिरीतल्या खोल पण संथ पाण्यात आवश्यक तेवढे हातपाय हलवून नुसते तरंगत राहण्यात जी मजा असते ती अशा वक्तृत्वात येते. माडगूळकर हे खंदे वक्ते आहेत. उत्तम नट आहेत. अशा सभेला लागणारा रुंद आवाज त्यांच्याजवळ आहे. त्यांच्याकडून ही अपेक्षा होती. पण तसे घडले नाही खरे. कदाचित अध्यक्षीय भाषणांची परंपरा व्यासपीठावरील बड्या मंडळींची उपस्थिती, समोरचा प्रचंड जनसमुदाय या सर्वांचेच एक दडपण त्यांच्या मनावर आले असावे. तसे ते येतच. चांगले चांगले वक्तेही प्रारंभी थोडा वेळ अस्वस्थ असतात. मागाहून विचारले तेव्हा ते म्हणाले, "अरे, ही स्मरणशक्ती हल्ली मला दगा देते फार. काही गोष्टी मी पार विसरून जातो. म्हणून शेवटी भाषण वाचायचं असं ठरवलं."

भाषण फार मोठे नव्हते: खूप लिहायला महामंडळाने वेळच ठेवला नव्हता. त्यामुळे जांभया सुरू व्हायच्या आत त्यांचे भाषण संपले. मी निरखून पहात होतो. श्री. चव्हाण हे एकाग्रपणे त्यांच्याचबरोबर त्यांचे भाषण मनात वाचीत पाने उलटीत होते. बाकीची मंडळी थोडे ऐकत होती, थोडे चाळीत होती. कुणी नुसते देवासारखे गप्प बसून होते. कुणाच्या हलकेच गप्पागोष्टी चालल्या होत्या. व्यासपीठावर काही सोयीही असतात. वक्त्याचे श्रोत्यांना उद्देशून जे भाषण चाललेले असते त्यापैकी काहीही पाठीमागे ऐकू येत नाही. पुढचे श्रोते कशाला हसले आणि कशाला टाळ्या वाजवताहेत याचा अजिबात पत्ता लागत नाही मग दुसरे काय करायचे ?

¤

साहित्य-संमेलनासंबंधी लोकांचा उत्साह केवळ अवर्णनीय वाटला. कोणत्याही कार्यक्रमाला मांडव जवळजवळ भरलेला दिसायचा. मी अगदी चकित होऊन गेलो. परिसंवादासारख्या रुक्ष, केवळ भाषणाच्या कार्यक्रमाला कुठली गर्दी होणार असे वाटले. कविसंमेलन तर सकाळी होते. ही वेळ काय कविता ऐकायची आहे ? निम्मा मंडपसुद्धा भरणार नाही. पण आमच्या या कल्पना अगदी चुकीच्या ठरल्या. प्रत्येक कार्यक्रमात लोक तुडुंब गर्दी करीत होते. हशा उसळत होता. टाळ्यांचे गजर होत होते. लोक येत होते, जात होते. गप्पागोष्टी चालू होत्या. सगळीकडे उत्साह नुसता ओसंडत होता. कदाचित यवतमाळसारख्या एका जिल्ह्याच्या गावीसुद्धा लोकांची ही भूक भागली जात नसावी. त्यांच्या दृष्टीने एवढ्या मोठ्या संख्येने साहित्यिकांची उपस्थिती आणि त्यांचे वेगवेगळे कार्यक्रम म्हणजे कुंभमेळ्याचीच पर्वणी ! प्रत्येकाने या गंगेत अंग बुचकळून काढलेच पाहिजे. असा योग पुन्हा कुठला यायला ? पहिल्या परिसंवादाला मी अगदी शेवटीशेवटी गेलो. पण गर्दी हलायला तयार नव्हती. अलीकडच्या मराठी साहित्यातील स्त्री आणि तिचे चित्रण, असा काहीसा विषय होता. भावे–गाडगीळांसारखे मल्ल त्यात होते. मुद्दे, विषयांतर, श्रोत्यांना आवडणारे आणि न आवडणारे विचार सगळ्या गोष्टी त्यात येऊन गेल्या. माडगूळकर म्हणाले, 'विषयांतर फार होत गेले. स्त्रीला कुणी हात लावलाच नाही असे म्हणा-

यची पाळी आली.' दुसऱ्या दिवशी परगावच्या एक स्त्री-प्रतिनिधी भेटल्या. परिसंवादाचा विषय निघाल्यावर त्या म्हणाल्या, 'भाषणं वक्तृत्वाच्या दृष्टीनं चमकदार झाली. पण विचाराच्या दृष्टीनं आमच्या पदरात फारसं काही पडलं नाही.'

हे कवि-संमेलन मात्र 'नावरे आवरीता' असेच नेहमी होते. जुन्या कवींना जेवढा वाव मिळतो तेवढा नवीन पिढीतील कवींना मिळत नाही. त्यांची कुचंबणा होते. लोक कंटाळू लागतात, जेवायची वेळ होऊन गेल्याची आठवण होऊ लागते. एकेक उठू लागतात आणि मग या कविमंडळींना पुकारले जाते. त्यांच्यावर अन्यायच होतो. खरे म्हणजे या मंडळींना आधी संधी दिली पाहिजे आणि जुन्या मंडळींनी मागे राहिले पाहिजे. इतक्या सगळ्या अडचणीवर मात करून काही कवींनी श्रोत्यांना संतुष्ट केले. श्रीधर शनवारे, लक्ष्मीकांत तांबोळी, मधुकर केचे इ. नी चैतन्य आणले. अनील, राजा बढे यांच्याही कविता 'बढया' झाल्या. कविभूषण खापर्डे, पां. श्री गोरे या विदर्भातील वयोवृद्ध कवींनीही उत्साहाने यात भाग घेतला होता हे विशेष. मंगलागौरीच्या रात्री लहान पोरींच्या फुगडीत काही म्हाताऱ्याकोताऱ्या आजीबाईही दमदारपणे भाग घेऊन सगळ्यांना आपल्या उत्साहाचे दर्शन घडवितात, त्यावेळी जसे वाटते तसे काहिसे वाटत होते. त्यादिवशी सकाळी अखेर कवि-संमेलन पुरे झालेच नाही. दुसऱ्या दिवशी समारोपाचा कार्यक्रम झाल्यावर उरलेले तीसचाळीच कवी यशवंत–अनील यांनी मोठ्या चिकाटीने भरडून काढले एकदाचे!

¤

रोज रात्री काहींना काही मनोरंजन होतेच. पहिल्या दिवशी रात्री यवतमाळकर मंडळींचे नाटक होते. (दिवसभराच्या थकावटीमुळे मी मात्र नाटकाला गुंगारा देऊन चक्क झोप काढली.) दुसऱ्या दिवशी रात्री ती जबाबदारी आमच्यावर टाकली होती. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि मी–आमचे नेहमीचे कथाकथन होते. त्यामुळे पुण्या-मुंबईची बरीच ठळक मंडळी 'ऐकलेला कार्यक्रम' या सबबीखाली गडप झालेली होती. तरी मांडव गच्च भरला होता. श्री. ग. दि. माडगूळकरांनी कथाकारांचा परिचय मोठ्या खुमासदार रीतीने करून दिल्यामुळे तो बऱ्याच जणांना आवडला. एकूण हा कार्यक्रम लोकांना पसंत पडल्याचे दिसले. स्वतः अध्यक्षांनीही एक गोष्ट सांगितल्यामुळे त्याला विशेष रंगत आली.

आमच्या कार्यक्रमाचा एक तोटा मात्र झाला. दोन दिवस आम्ही अज्ञात होतो. कार्यक्रम झाल्याबरोबर स्वाक्षरीवाल्या शाळकरी पोरापोरींचा घोळका पाठीमागे लागला. सुमारे शे-दीडशे जणांचा तरी हा तांडा असावा. त्यांचा उत्साह बेफाम होता. मांडवात आलेला प्रत्येक अपरिचित माणूस हा साहित्यातील कुणी थोर पुरुष आहे याबद्दल त्यांची खात्री होती. त्या सगळ्यांची स्वाक्षरी ते घेत सुटले होते. केवळ साहित्यिकच नव्हे तर त्यांच्याबरोबर

असलेल्या मित्रांना आणि नातेवाईकां-नाही त्यानी भंडावून टाकले. (एखादी वऱ्यापैकी शहरी बाई दिसली की तिचीही स्वाक्षरी ते मागत.) सामान्य-पणे मी या शाळकरी मुलांना कधी नाराज करीत नाही. पण यवतमाळच्या मांडवात सह्या करता करता अगदी मेटाकुटीला आलो. मांडवात प्रवेश कर-ताना किंवा कुणाशी बोलतांना गनिमी काव्याचाच आश्रय पुढे घ्यावा लागला. या आमच्या सह्या वाचून मग मुलांना आम्ही कोण ते समजे, कित्येकांना तर सह्याही वाचता येत नसत (सह्याच तशा असत) आणि मग ते गोंधळून 'हा कोण रे ?' असे एकमेकांना विचारीत. त्यामुळे स्वाक्षरी देताना अहंकाराचा भाव यत्किंचितही नव्हता.

□

दोन दिवसांच्या या उत्साहपूर्ण कार्यक्रमावर तिसऱ्या दिवशी मात्र अक्षरशः पाणी पडले. पाऊस एकाएकी सुरू झाला आणि सगळीकडे चिकचिक झाली. मांडपातही खूप गळाले. बसायला नीट जागा उरली नाही. त्यामुळे उर-लेला परिसंवाद, माजी अध्यक्षांचे सत्कार, खुले अधिवेशन इ. सगळया गोष्टी समोरच्या शाळेतील त्यातल्या त्यात मोठ्या हॉलमध्ये उरकूनच घ्यावे लागले. शे-दोनशे माणसेसुद्धा बसू शकणार नाहीत एवढीच जागा. त्यामुळे बाहेरच गर्दी थबकून राहिली. गप्पा-ष्टकांचे अड्डे जमले आणि कंटाळलेले परत निघून गेले. दिवसभर पुनः पावसाने तोंड न दाखवल्यामुळे संध्या-काळी समारोपाचा कार्यक्रम मात्र मांडवातच झाला. पुनः तशीच गर्दी झाली. माडगूळकरांनी समारोपाचे भाषण अगदी अनौपचारिकपणे केले. त्यामुळे ते चांगलेही झाले. या भाषणात त्यांनी सांगितलेली 'पांढऱ्या टोपीची गोष्ट' कुणाच्याही लक्षात राहील अशी होती. प्राचार्य राम शेवाळकर यांनी संमेलनाच्या वतीने सर्वांचे आभार मानताना जे हृद्य भाषण केले ते अनेक दिवस लक्षात राहील. आभाराचे भाषण इतके जिवंत क्वचितच होते.

तीन-चार दिवस हा वाग्यज्ञ अखंड चाललेला होता. यवतमाळमध्ये थोडे हिंडावे असे मनात होते. पण कार्यक्रमा-मागून कार्यक्रम अशी रीघच लागल्या-मुळे ते अशक्य झाले. पण मांडवाच्या आसपास, निवासस्थानी ओळखीची मंडळी खूप भेटली. साहित्यिक मित्र तर पावलोपावली भेटत होते. सगळ्यांशी बोलणे अशक्य व्हावे इतके. फार थोड्या मंडळींशी गप्पागोष्टी झाल्या. काहींशी फक्त खुशालीचे बोलणे. बाकीच्यांना तर दुरूनच हास्यमुद्रा आणि नमस्कार. सगळ्यांशी नीट बोलता आले नाही, एवढी रुखरुख राहून गेली.

पहाटे परत निघायचे ठरले होते. रात्री सहज मांडवात डोकावलो. पाऊस थोडा थोडा पडत होता. मांडवात ठिक-ठिकाणी गळत होते. व्यासपीठासमोरचा मुख्य मांडव रिकामाच होता. रसिक श्रोते दाटीवाटीने बाजूच्या व्हरांड्यात बसले होते आणि डॉ. वसंतराव देशपांडे यांच्या खड्या स्वरातील मधुर गाण्याने ते ओले वातावरण आणखीन् भिजून गेले होते...

● ● ●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649


# फसलेला क्षण

'दि डे ऑफ जॅकल' या
कादंबरी परिचयाचा उत्तरार्ध

# माणूस चित्रवार्ता

१ डिसेंबर अंकात

सादरकर्ते : वि. स. वाळिंबे